www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी
# युवक आधार

दै.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 185 वा शुक्रवार दि. 21 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




## मुंबई विद्यापीठाकडून परीक्षांच्या तारखेत बदल

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

**मुंबई** : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत (सीईटी कक्ष) विविध अभ्यासक्रमांसाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षा आणि मुंबई विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ अंतर्गतच्या उन्हाळी सत्रातील काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा एकाच तारखेला होत आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी मुंबई विद्यापीठाने सदर परीक्षांच्या तारखा बदलत सुधारित वेळापत्रक mu.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. २४ मार्च ते ३ एप्रिल या कालावधीतील विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. परीक्षांच्या तारखांमध्ये बदल झाला असला तरी परीक्षेची वेळ आणि परीक्षा केंद्रांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, असे मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्पष्ट केले आहे. संबंधित परीक्षा अन्य दिवशी घ्याव्यात, अशी मागणी विद्यार्थी संघटनांनी केली होती.

**सुधारित वेळापत्रक**
मानव्यविद्याशाखेच्या २६, २७, २८ मार्च आणि २ व ३ एप्रिल रोजी होणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा अनुक्रमे ५, १९, २१, २२, आणि २३ एप्रिल रोजी. वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेच्या २४, २५, २६, २७, २८ मार्च व २ आणि ३ एप्रिल रोजी होणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा अनुक्रमे ५, ७, ८,९,११, १५ आणि १६ एप्रिल रोजी.
विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गतची २६ मार्च रोजी होणारी तृतीय वर्ष विदा शास्त्र (डेटा सायन्स) सहाव्या सत्राची परीक्षा आता ४ एप्रिल रोजी. तृतीय वर्ष विज्ञान शाखा, संगणकशास्त्र, जैवतंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान अभ्यासक्रमाच्या सहाव्या सत्राची १ एप्रिल रोजी होणारी परीक्षा आता ४ एप्रिल रोजी होणार आहे.

## सिडको ठेकेदारी सुरक्षा रक्षकांना रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामध्ये वर्ग करुन घ्या
### हिन्द मजदूर किसान पंचायतचचे सामुहिंक आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/प्रतिनिधी**



सिडकोतर्फे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना रोजगारा निमित्त 221 सुरक्षा रक्षकांची नियुक्ती नवीन पनवेल, पनवेल, कळंबोली आदि ठिकाणी ठेकेदार मेसर्स विशल प्रोटेक्शन फोर्स मालाड यांच्या तर्फे 1994 पासून कार्यरत आहेत. ते ही किमान पगार, महागाई भत्ता, घर भाडे भत्ता, रजा, युनिफॉर्म आदी सुविधा देत नाहीत. या संदर्भात एक वर्षापूर्वी मागणी करुनही सदर सुरक्षा रक्षकांना सुरक्षा रक्षक मंडळामध्ये नोंदणीकृत करुन घेतलेले नाही. तसेच 22 सुरक्षा रक्षकांना एप्रिल 2024 पासून पगार देण्यात आलेला नाह. यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. या कर्मचाऱ्यांची जबाबदारी सिडको-पनवेल आणि सुरक्षारक्षक मंडळानेही घेतलेली नाही. यासाठी 19 मार्च रोजी सुरक्षा रक्षक मंडळावर 221 सुरक्षा रक्षकांच्या त्वरीत नोंदण्यांवरुन बोर्डात समाविष्ट करुन घ्यावे या मागणी साठी मोर्चा काढण्यात आला. यावेळी लवकरात लवकर नोंदणी न झाल्यास उपोषणाचा इशाराही देण्यात आला आहे. जोपर्यंत 221 सुरक्षा रक्षकांच्या सरसकट नोंदण्या होत नाहीत तो पर्यंत पनवेल पालिकेस बोर्डातर्फे एकही सुरक्षा रक्षक पुरविला जावू नये तसे केल्यास आंदोलन करण्याचा इशाराही हिंद मजदूर किसान पंचायतने दिला आहे. 22 सुरक्षा रक्षकांना मागील एक वर्षे पगार दिलेला नाही तो पगार सिडको-पालिका कि सुरक्षा रक्षक मंडळाने निर्णय घेवून त्वरीत देण्यात यावा तसेच सुरक्षा रक्षक मंडळाचे नियम व अटी डावलून सिडकोला खाजगी ठेकेदाराने सुरक्षा रक्षक एजन्सी सुरु ठेवल्याप्रकरणी त्याच्यावर पैशाच्या हव्यासापोटी कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोपही हिंद मजदूर किसान पंचायतने केला आहे. या सर्व मागण्याची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पंचायत तर्फे देण्यात आला.

## आई- बाप आपल्या लेकरांना घडविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतात.
### आई- बाप काय असतात हे व्याख्यानातून समजून मुलां मुलींनी घेयावे - कवळे पतसंस्थेचे चेअरमन मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी केले आहवान

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**



**नांदेड -** येथील कै.व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्थांच्या संयुक्त विद्यमाने आपण नुसते बँकिंग व्यवहार न करता समाजाला काही देणे लागतो ते ऋण फेडण्यासाठी या भावनेतून व्हिपीके पतसंस्था सामाजिक बांधिलकी जोपासत अग्रेसर जिल्हा काम करते तेच कार्य करत नांदेड शहरातील किशोर वयीन मुले मूलींना आपल्या आई वडील यांच्या नात्यातील संबंध काय असते आपल्या लेकरांना घडविण्यासाठी किती पराकाष्ठा करतो तरीही लेकरांना आईवडीलाचे महत्त्व कळत नाही तर एकीकडे ज्या लेकरांना आई आहे वडील नाहीत त्याला अडचणीवेळी वडीलांची महत्त्व कळते तेव्हा आठवण येते असे सुंदर व्याख्यान सांगणारे प्रभावे प्रसिद्ध व्याख्याते मा.श्री.वसंत हंकारे प्रथमच नांदेड शहरात येत असून त्यांनी आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून आई- बाप समजून घेताना हा विषयावर सखोल मार्गदर्शन करणार असून विद्यार्थी जीवन घडविण्यासाठी सखोल माहिती नवा मोंढा मैदान येथील कृषी उत्पन्न बाजार समिती मैदानावर येथे दि.२० मार्च रोजी गुरूवारी सायंकाळी ४ ते ९ वाजेपर्यंत देण्यात येणार आहे .ज्यानां आई बाप असतात त्या लेकरांना या दोघांचे म्हत्व कळेना ज्यांना आई किंवा बाप नसल्याने काय परिस्थिती उदभवते हे जाणून घेण्यासाठी त्यासाठी पालकांनी आपल्या मुलांना व मुलींना उज्ज्वल भविष्य करिता हे व्याख्यानातून माहिती देण्यात येणार आहे त्यासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित असे विनंती कै. व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे चेअरमन मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी आहवान केले आहे.

## इंद्रराज महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी:**
**योगेश पालोदकर**



**सिल्लोड :- सिल्लोड येथील** इंद्रराज कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नुकताच पदवी वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. ऑक्टोबर/ नोव्हेंबर 2023, व मार्च /एप्रिल 2024 या दोन परीक्षेतून उत्तीर्ण झालेल्या बी. ए./बी. एस्सी./ एम. एस्सी. च्या पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण संस्थेचे सचिव श्री. अशोक देवरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ शिक्षणतज्ज्ञ व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. प्रदीप जबदे यांची उपस्थिती होती. संस्थेच्या कार्यकारिणी सदस्या से. नि. प्राचार्य डॉ. सौ.छाया महाजन यांची याप्रसंगी विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्यंकटेश लांब, विद्यार्थी संसदेचा सचिव रोहित आरके त्याचप्रमाणे समितीतील सदस्य डॉ प्रमोद पाटील, डॉ अशोक पवार, डॉ. जे एस. अंभोरे, डॉ.संतोष चौथाईवाले, डॉ.माधवसिंग इंगळे, डॉ.सुचिता देशमुख, डॉ. उज्वला कळात्रे तसेच कार्यालयीन अधीक्षक श्री किरण राजपूत आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी बोलत असताना प्रमुख पाहुणे डॉ प्रदीप जबदे यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी मेहनत करण्याचे आणि परिश्रम घेण्याविषयी आवाहन केले. तसेच त्यांनी आपल्यातील कौशल्य ओळखून ते विकसित करण्याचे आवाहन केले. विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सुरुवातीला पदवी प्राप्त विद्यार्थ्यांची व प्रमुख पाहुण्यांची मिरवणूक महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून सभामंडपापर्यंत काढण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. डॉ.महेश बाबरेकर व त्यांच्या चमुने विद्यापीठ गीत सादर केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.व्यंकटेश लांब यांनी प्रास्ताविक केले यानंतर अध्यक्षीय भाषणातून श्री.अशोक देवरे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या हातून देशसेवा व लोकसेवा करण्याचे आवाहन केले. त्यासाठी सर्वांनी कटिबद्ध होऊन यशस्वी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ प्रमोद पाटील तर सूत्रसंचालन डॉ. संतोष चौथाईवाले यांनी केले. याप्रसंगी बीए /बीएस्सी.व एम एस्सी. च्या पदवी प्राप्त स्नातकांना पाहुण्यांच्या हस्ते पदव्या वितरीत करण्यात आल्या. कार्यक्रमासाठी परिसरातील बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. प्रमोद पाटील, डॉ. संतोष चौथाईवाले, डॉ. महेश बाबरेकर, प्रा. मनोज पालवे, श्री कल्याणसिहं पवार, श्री केशव पगारे, श्री. संदीप चोपडे, श्री. कृष्णा कुमावत यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नाशिक ते संभाजी मार्गावर वाहणातून विनापरवाना बेकायदा गुटखा पानमसाला पोलिसांनी केला जप्त

**दैनिक युवक आधार**
**राहुल कुलकर्णी निफाड नाशिक**



**निफाड - नाशिक ते छत्रपती संभाजीनगर मार्गावर** मौजे बोकडदरे शिवारात वाहनातून विनापरवाना बेकायदा गुटखा पानमसाला इ. वाहतुक करताना आढळलेल्या आरोपीला पोलिसांनी मुद्देमालासह ताब्यात घेतले. याबाबत पोलीस शिपाई बाबुराव विनोद जाधव यांनी निफाड पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.त्यावरून दुर्गेश सुमतीलाल छाजेड वय २४ वर्ष रा. विद्यानगर बाफनासदन लासलगाव ता निफाड हे आपली व्हॅटो कार क्र एम एच १५,इ पी ३७८९ यामधून बेकायदा गुटखा घेऊन जात होते.त्यामध्ये एक खाकी रंगाचा बॉक्स त्यात रजनीगंधा पान मसाला , एक गोणी तुळसी रॉयल तवांखूच्या ६४ बॉक्स त्यात त्यावर २८६ रुपये किंमत छापलेली, एक प्लॅस्टीक गोणी तिचेत ५ लहान (जैस्टीक गोण्या प्रत्येक गोणीत २० पुढे त्यावर प्रत्येकी किंमत ४७० रुपये छापलेली, एक गोणी लहान ५ प्लॅस्टीक गोण्या प्रत्येक गोणीत २० पुडे त्यावर प्रत्येको किर्मत ३० रुपये अशी छापलेली हा मुद्देमाल घेऊन जातांना आढळून आले.महाराष्ट्र राज्यात विक्रीस व वाहतुकीस प्रतिबंध असलेल्या गुटखा पान मसाला तंबाखू असा सेवन करण्यास मानवी शरीरास हानीकारक असलेला माल मिळुन आला म्हणून छाजेड यांच्यावर भा. न्या. संहिता क १२३,२२३,२ ७१,२७४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास निफाड पोलीस करत आहे.

## उपोषणाचा चौथा दिवस, माती उत्खनन प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



माती उत्खनन केल्याप्रकरणी दोषींवर गुन्हा दाखल करण्यासाठी चिखले ग्रामस्थांनी पंचायत समिती, पनवेल येथे उपोषण पुकारले आहे. उपोषणाचे त्यांचे चौथे दिवस आहे मात्र प्रशासनाकडून अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

चिखले ग्रामपंचायतचे माजी सरपंच आणि ग्रामसेविका यांच्यावर माती उत्खनन करून विक्री केल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यासोबत जमीन खरेदी करणारे आणि माती विक्री करणाऱ्यांवर अपहार व फौजदाररी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यासाठी दत्तात्रय तांडेल यांच्यासह ग्रामस्थ, महिला यांनी पंचायत समिती पनवेल येथे चार दिवसापासून आमरण उपोषण पुकारले आहे. यावेळी प्रशासन योग्य दखल घेत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. पंचायत समिती पनवेल येथून पंख्यासाठी वीज देखील दिली नसल्याचे तांडेल यांनी यावेळी सांगितले. या प्रशासनाचा त्यांनी निषेध व्यक्त केला. या माती उत्खननात लाखो रुपये लाटल्याचा आरोप केला जात आहे. 17 मार्चपासून पंचायत समिती, पनवेल येथे आमरण उपोषण सुरू करण्यात आले. बुधवारी रात्री तहसीलदार विजय पाटील, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, गटविकास अधिकारी यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत उठणार नाही अशी ठाम भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली आहे.

## कर्जत येथील नव्या रेल्वे स्थानकाला हुतात्मा हिराजी पाटील यांचे नाव द्या
### सुधाकर घारे यांची केद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**कर्जत, वार्ताहर**



: **मुंबई-**पनवेल-कर्जत उपनगरीय कॉरिडॉर रेल्वे मार्गाच्या होत असलेल्या कर्जत येथील नवीन रेल्वे स्थानकाला वीर हुतात्मा हिराजी पाटील यांचे नाव द्यावे अशी मागणी रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी कर्जत येथे पत्रकार परिषदेत केली.
या मागणीबाबतचेपत्र आम्ही केंद्रीय रेल्वे मंत्री अश्वीनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच खासदार सुनील तटकरे, मंत्री अदिती तटकरे यांना दिले असून खासदार सुनील तटकरे यांनी याबाबत पाठपूरावा करण्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती देखील सुधाकर घारे यांनी दिली. यावेळी बोलताना घारे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात अनेक विकासकामे होत आहेत. त्यातीलच एक महत्त्वाचे काम म्हणजे पनवेल कर्जत उपनगरीय रेल्वे कॉरिडॉरचे काम सुरु आहे. आपल्याकडे मुंबई कर्जत असा जो रेल्वेमार्ग आहे. तो मुंबई- ठाणे- कल्याण- बदलापूर -कर्जत हा रेल्वे मार्ग आहे. मात्र आता पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वे कॉरिडॉर होत असल्याने कर्जतच्या विकासाला गती मिळणार असून रेल्वे प्रवाशांची देखील सोय होणार आहे, त्याबद्दल मी केंद्र आणि राज्य सरकारचे आभार मानतो.
घारे म्हणाले, आपल्या कर्जतचे महान सुपुत्र आणि भारतीय **पान २ वर**



## संपादकीय

### भाजपच्या नव्या अध्यक्षांचे नाव अखेर ठरले... ?

भाजपच्या नव्या अध्यक्षांबाबत पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघात मतैक्य झाल्याचे दिसते. १५ महिने रखडलेला हा प्रश्न त्यामुळे मार्गी लागण्याची चिन्हे आहेत. जयप्रकाश नड्डा यांच्या जागी येणाऱ्या नव्या अध्यक्षांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर काम करावे लागेल. पितृसंस्था असलेल्या संघामधून ही व्यक्ती आलेली असेल. संघपरिवारातून मिळालेल्या माहितीनुसार २० एप्रिलपर्यंत नव्या अध्यक्षांची निवड होईल, असे स्पष्ट होते. जयप्रकाश नड्डा यांची मुदत गेल्या जानेवारीत संपल्यानंतर सार्वत्रिक निवडणुका तोंडावर असल्यामुळे पक्ष घटनेशी तडजोड करून पक्षाच्या संसदीय मंडळाने आणीबाणीची परिस्थिती म्हणून पक्षाध्यक्षांची मुदत वाढवून दिली. नागपूरस्थित संघ मुख्यालयाला पंतप्रधान नरेंद्र मोदी मार्चअखेरीस भेट देण्याची शक्यता असून कटकटीचे ठरलेले अनेक मुद्दे त्यावेळी सोडवले जातील असे मानले जाते. दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी संघ मुख्यालयाला भेट टाळली होती; त्यामुळे अशी भेट देणारे मोदी हे पहिले पंतप्रधान ठरतील. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही भाजपाची पितृसंस्था असून मोदी कट्टर स्वयंसेवक आहेत. आपल्या जीवनावर संघाचा खोलवर प्रभाव पडलेला आहे, असे मोदी वारंवार सांगत असतात. संघाला पाठिंबा देण्याचा, सौहार्द राखण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. हरियाणाचे माजी मुख्यमंत्री, केंद्रीय नगरविकास आणि गृहनिर्माण मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ पडेल, अशी चिन्हे आहेत. खट्टर अविवाहित असून त्यांनी पूर्णवेळ प्रचारक म्हणून काम केलेले आहे. तसेच मोदींशी त्यांची जवळीक आहे. दक्षिण भारतातून आलेले केंद्रीय मंत्री जी. किशन रेड्डी यांचेही नाव अजून पूर्णपणे मागे पडलेले नाही असे अंतर्गत सूत्रे सांगतात. तरीही खट्टर यांच्या नावावर मतैक्य होत आहे असे दिसते. कांशीराम यांना मायावती या त्यांच्या उत्तराधिकारी एका झोपडपट्टीत सापडल्या होत्या. अरविंद केजरीवाल यांचा प्रवासही बाह्य दिल्लीतील सुंदरनगर या झोपडवस्तीतून सुरू झालेला असून सनदी अधिकारी ते भ्रष्टाचार निर्मूलन कार्यकर्ता अशी वाटचाल त्यांनी ‘परिवर्तन’ या त्यांच्या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून केली. मात्र, गेल्या दोन दशकात केजरीवाल दिल्लीतल्या शीशमहलापर्यंत पोहोचले आणि कालांतराने रस्त्यावरही आले. जनतेच्या जीवनात परिवर्तन घडविण्याऐवजी स्वतःच परिवर्तित झालेला माणूस म्हणून त्यांची प्रतिमा तयार झाली. परिणामी आम आदमी पक्षाचा दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाला. या देशाचे राजकारण कधी तरी बदलेल, अशी आशा करणाऱ्या लोकांचा तो मोठा अपेक्षाभंग होता. भारत भ्रष्टाचारमुक्त होईल या स्वप्नाचा अंत झाल्याने ‘आप’च्या भवितव्यावरही प्रश्नचिन्ह उमटले. २०२० साली ‘आप’चा वारू रोखता येणार नाही असे वाटत होते. पुढे अकालींना निष्प्रभ करीत या पक्षाने काँग्रेसकडून पंजाब हिसकावून घेतले. मात्र, तितक्याच वेगाने त्याची प्रभा लोप पावली, आणि पतन पाहावे लागले. काय चुकले याचा अंतर्मुख होऊन विचार करण्यासाठी केजरीवाल विजनवासात गेले असले जरी आपली आरामशीर जीवनशैली सोडायला मात्र ते अद्याप तयार नाहीत. अजूनही गाड्यांच्या ताफ्यात राहूनच ते प्रवास करतात. साध्या घरात राहण्यास ते आजही इच्छुक नाहीत.दरम्यान, आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय निमंत्रक आणि अरविंद केजरीवाल यांचे विश्वासू सहकारी मनीष सिसोदिया यांना पंजाबमधून राज्यसभेवर पाठवले जाईल, अशी जोरदार बोलवा राजधानी दिल्लीत पसरली आहे. केजरीवाल यांचे राज्यसभेवर जाण्याची मनसुबे उधळले गेल्याने आता सिसोदिया यांचे नाव पुढे आले आहे.

# देशाचे राष्ट्रपती आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना बहुजन जनता दलाचे निवेदन

**दैनिक युवक आधार**
**सहसंपादक**
**मुकुंद कांबळे**

महाडच्या चवदार तळ्याचा 20 मार्चचा सत्याग्रहा राष्ट्रीय जलक्रांती दिन म्हणून घोषित करावा. पंडितभाऊ दाभाडे पुणे दि. भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी महाराष्ट्राच्या कोकण विभागातील रायगड जिल्ह्यातील महाडच्या चवदार तळ्यावर दलित वंचित भटके उपेक्षित आणि अस्पृश्यांना पिण्याच्या पाण्यासाठी जे ऐतिहासिक व क्रांतिकारी सत्याग्रह केला होता त्या सत्याग्रहाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नोंद घ्यावी महाडच्या चवदार तळ्याचा २० मार्च १९२७ रोजीचा सत्याग्रहा, राष्ट्रीय जलक्रांती दिन म्हणून घोषित करावा यासाठी बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा श्री पंडितभाऊ दाभाडे यांनी देशाचे महामाहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्म आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन मागणी केली आहे. बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा श्री पंडितभाऊ दाभाडे यांनी पुणे जिल्हा अधिकाऱ्यां मार्फत देशाचे महामाहीम राष्ट्रपती द्रोपती आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की भारताच्या तीन सहस्त्र वर्षाच्या इतिहासातील माणुसकीचा व सामाजिक न्याय समता आणि समानतेचा संदेश देणारा सुवर्ण दिवस म्हणजे २० मार्च १९२७ हा होय या दिवशी महामानव भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीभेद भिक्षुक शाही या सामाजिक अत्याचार गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी विरुद्ध बंड उभारून दलित वंचित भटके उपेक्षित आणि हजारो अस्पृश्य समाजाला सोबत व सहभागी घेऊन रायगड जिल्ह्यातील महाडच्या चवदार तळ्यावर सत्याग्रह केला आणि महाडच्या चवदार तळ्यातील पाणी दलित वंचित भटके उपेक्षित व हजारो अस्पृश्यांसाठी पिण्याचे पाणी तळ्यातील पिण्यासाठी खुले करून दिले ज्या तळ्यातील पाणी गुराढोरांना पिण्यासाठी मुभा होती परंतु दलित वंचित भटके उपेक्षित आणि असे अस्पृश्या समाजाच्या नागरिकांना मात्र पाणी पिण्यासाठी आणि वापरण्यासाठी मुभा नव्हती सामाजिक चिड आणणाऱ्या या बाबीचा गंभीर विचार करून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रखर विरोध करीत महाडच्या 14 तळ्यावर मोठी इतिहासिक जलक्रांती केली या घटनेची नोंद राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आणि इतिहासात सुवर्ण अक्षराने कोरून कायमस्वरूपी व्हावी म्हणून २० मार्च १९२७ हा दिवस राष्ट्रीय जलक्रांती दिवस म्हणून देशाचे महा माहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा श्री पंडितभाऊ दाभाडे यांनी दिलेल्या निवेदनाचा विचार करून महाडच्या चवदार तळ्याचा २० मार्च १९२७ चा सत्याग्रहा राष्ट्रीय जलक्रांती दिन म्हणून घोषित करावा अशी मागणी देशाचे महामाहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनाद्वारे बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा श्री पंडितभाऊ दाभाडे यांनी केली आहे असे बहुजन जनता दलाच्या केंद्रीय मध्यवर्ती कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे

# श्री शिवाजी विद्यालय रिसोड येथे जागतिक चिमणी दिन साजरा




**रिसोड वार्ताहर रणजीत सिंह ठाकुर**

**रिसोड**-स्थानिक श्री शिवाजी विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे दिनांक 20 मार्च रोजी जागतिक चिमणी दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री संजय देशमुख होते तर मार्गदर्शक म्हणून उपप्राचार्य श्री संजय नरवाडे व पर्यवेक्षक गजानन भिसडे हे होते. राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक श्री विठ्ठलराव सरनाईक यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले तसेच या कार्यक्रमास सामाजिक वनीकरण विभागाचे श्री विष्णू जटाळे व कुमारी निर्जला डिगोळे व वनरक्षक श्री रमेश कदम यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष्यांना उन्हापासून संरक्षण मिळावे आणि पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी जलपात्र व घरटी उभारण्याचा स्तुत्य उपक्रम आयोजित करण्यात आला शिवाजी विद्यालयातील चिमुकल्याने जागतिक पर्यावरण दिनी पक्षांसाठी जलपात्रे व घरटी लावण्यात आली. तसेच या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना जलपात्राचे वाटप करण्यात आले. यावेळी नगरपरिषद चे पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी विनोद बांगर पाणीपुरवठा त्यांच्याकडे असल्याने मानव असो या पशुपक्षी असो यांच्यापर्यंत पाणी पुरवण्याचे कार्य ते सतत करत असतात. यानुसार त्यांनी मागील वर्षी गुराढोरांसाठी शहरांमध्ये विविध ठिकाणी 25 हौद (पानवठे) लावले होते तर यावर्षी 150 पेक्षा जास्त चिमण्यांसाठी घरटे व पानवठे लावलेले आहेत. यांची चिमण्यांना वाचविण्यासाठी जी धडपड आहे. ते हेरून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या कार्याची दखल घेऊन शाळेच्या वतीने चिमणी दिवसाचे अवचित साधून विनोद बांगर यांचा सत्कार करण्यात आला. शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या उपक्रमासोबतच पर्यावरणाचा होणारा -हास व वाढते तापमान तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. शिवाजी विद्यालयाने राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व पालकांकडून व नागरिकांकडून कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री विठ्ठल सरनाईक यांनी तर आभार श्री विनोद बावणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वन कामगार विजय ठाकरे व अक्षय आडे शिवाजी देव्हडे यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

## महाबँकेतील कर्मचाऱ्यांनी कामगार भरतीसाठी केला संप

. दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

बँकिंग उद्योगातील व बँक ऑफ महाराष्ट्र मधील बहुसंख्य असलेली संघटना ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉइज फेडरेशनने आपल्या प्रमुख ७ न्याय मागण्यासाठी २० मार्च २०२५ ला संप यशस्वी केला. ह्या संपात बँकेच्या २५०० शाखेतील व ५१ झोन मधील सर्व सभासदांनी उत्साहानी सहभाग घेतला. याप्रसंगी मुंबई येथे बँकेच्या समोर उपस्थित राहून घोषणा देऊन बँक व्यवस्थापनाचे लक्ष्य वेधण्यात




आले.

ए.आय.बी.इ.ए. चे वरिष्ठ नेते देविदास तुळजापूरकर, ललिता जोशी, बँक ऑफ महाराष्ट्र महाराष्ट्र एम्प्लॉइज युनियन मुंबई चे अध्यक्ष, अरविंद मोरे, जनरल सेक्रेटरी, सुधीर पाटील, संघटन सचिव, पांडुरंग भोगले, महिला पदाधिकारी शितल पलांडे, दिशा घाग आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी देविदास तुळजापूरकर म्हणाले की २० मार्च हा क्रांतिकारी दिवस आहे. ह्याच दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवी मूलभूत हक्कासाठी महाड येथे पाण्यासाठी सत्याग्रह केला. ह्याच दिवशी महाबँकेतील कर्मचारी आपल्या न्याय मागण्यासाठी लढा देत आहे. बँकेत कर्मचारी कमी असल्याने ग्राहक सेवेवर परिणाम होत आहे असे सांगितले व चागल्या ग्राहक सेवेसाठी बँकेत कर्मचारी असणे आवश्यक आहे असे ते म्हणाले. ह्याला सर्वांचा पाठिंबा मिळून संप यशस्वी झाला असे सांगितले.

याप्रसंगी जनरल सेक्रेटरी, सुधीर पाटील यांनी ७ प्रमुख मागण्याबद्दल सविस्तर माहिती दिली. हा लढा बँकेतील कामगार भरतीसाठी आहे असे आवर्जून सांगितले. महिला नेते ललिता जोशी यांनी सांगितले की, आज हॅप्पी डे आहे. परंतु बँक कर्मचारी मात्र हॅप्पी नाहीत. बँकेत हॅप्पीनेस निर्माण व्हावा या न्याय मागण्यासाठी कर्मचारी लढा देत आहे असे सांगितले व संप ला पाठिंबा देऊन शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष, अरविंद मोरे यांनी सांगितले की हा लढा शोषणाच्या विरुद्ध आहे. कर्मचाऱ्यांना बँकेत उशिरा पर्यन्त, सुट्टीच्या दिवशी काम कराव लागत हे खऱ्या अर्थाने शोषण आहे. ह्या शोषणाचा विरुद्धच संप आहे.

## सुधाकर घारे यांची केद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे मागणी

**पान १ वरून** स्वातंत्र्यासाठी योगदान देणारे महान क्रांतीकारक वीर हुतात्मा हिराजी पाटील यांनी ब्रिटीश सरकारच्या विरोधात दिलेला लढा हा अत्यंत जाज्ज्वल्य इतिहास आहे. ब्रिटाशांविरोधात लढताना सिद्धगडच्या स्वातंत्र्यसंग्रामात वीर हिराजी पाटील यांना हौतात्म्य आले. अशा या वीर हुतात्म्यांचे स्मरण आपण ठेवले पाहिजे, त्यांची स्मृती आपण जपली पाहिजे, त्यांचे कार्य भावी पिढीला प्रेरणादायी ठरावे या उद्देशाने कर्जत पनवेल उपनगरिय रेल्वे कॉरिडॉरवरील कर्जत येथे होत असलेल्या रेल्वे स्थानकाला वीर हुतात्मा हिराजी पाटील कर्जत रेल्वे स्थानक असे नाव द्यावे अशी आमची केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडे मागणी असल्याचे घारे यावेळी म्हणाले.

पनवेल-कर्जत उपनगरिय रेल्वे कॉरिडॉरवरील कर्जत स्थानकाला वीर हुतात्मा हिराजी पाटील यांचे नाव देण्यासंदर्भात केद्रीय रेल्वेमंत्री अश्वीनी वैष्णव, राज्यपाल सी.पी. राधाकृष्ण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर, खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्याशी पत्रव्यवहार केल्याची माहिती यावेळी सुधाकर घारे यांनी दिली.

# रत्ना कलावर यांची थायलंड मध्ये मास्टर ऍथलेटिक मध्ये गोल्ड मेडल सह पाच पदकांची कमाई.

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

कर्नाटक मध्ये जन्मलेल्या सौ.रत्ना कलावर यांना शालेय जीवनापासूनच क्रीडा क्षेत्रात आवड होती. ऍथलेटिक मध्ये त्यांनी नॅशनल पातळीवर अनेक पदकं पटकावली आहेत. २०२५ सालच्या कर्नाटक मंगरूळ येथील ५००० मीटर चालण्याchya शर्यतीत सुवर्ण पदक, १५०० मीटर धावन्याच्या शर्यती मध्ये रौप्य पदक आणि ५००० मीटर धावन्याच्या शर्यती मध्ये कांस्यपदक जानेवारी 2025 मध्ये झालेल्या दक्षिण आशियातील अथलेटिक स्पर्धेमध्ये मिळवले आहेत. परंतु कौटुंबिक बिकट परिस्थितीमुळे जागतिक स्तरावरील स्पर्धामध्ये



त्यांना सहभागी होता आले नाही लग्नानंतर पनवेल मध्ये वास्तव्य करत असताना त्यांनी आपला सराव कायम ठेवला, वयाच्या ४८ व्या वर्षी बंटस संघ कुर्ला यांच्या आर्थिक सहकार्यामुळे रत्ना कलावर यांना थायलंड येथील दिनांक १२फेब्रुवारी ते १६,फेब्रुवारी ह्या काळातील ३९ थायलंड मास्टर ऍथलेटिक स्पर्धेत भाग घेता आला, सदर स्पर्धेत ४० ते ५० वयोगटातील, विविध देशातील महिल मध्ये पाच हजार मीटर रनिंग रेस मध्ये प्रथम येत त्यांनी गोल्ड मेडल पटकावले ,एक हजार पाचशे मीटर रनिंग रेस मध्ये त्यांनी तिसरा क्रमांक पटकावत ब्राँझ मेडल प्राप्त केले. तसेच आठशे मीटर रनिंग रेस मध्ये ही तिसरा क्रमांक पटकावत ब्राँझ मेडल प्राप्त केले भारतीय ४ महिलांचे १०० मीटर्स आणि भारतीय ४ महिलांचे ४०० मीटर्स रिलेमध्ये सुवर्णपदक प्राप्त केले,थायलंड चियांग राय थायलंड मास्टर ऍथलेटिक मध्ये एकूण पाच पदकांची त्यांनी कमाई केली आहे. सहकार्य करणाऱ्या बंटस संघ कुर्ला चे रत्ना कलावर यांनी आभार मानले आहेत. बिकट परिस्थितीवर मात करत त्यांनी प्राप्त केलेल्या पदकांचे सर्वत्र कौतुक होत आहे

## ग्रामपंचायत अजिंठा येथे एक दिवस गावकऱ्यासोबत (ग्राम दरबार) नाविन्यपूर्ण उपक्रम कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोडः-** विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, दिलीप गावडे यांच्या संकल्पनेतून एक दिवस गावकऱ्यासोबत हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे.भारतातील 65 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करून राहते. महात्मा गांधीजीच्या स्वप्नातील खेडी स्वयंपूर्ण व स्वयंशासित असावीत अशी प्रत्येक गावातील नागरिकांची अपेक्षा असते या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनामार्फत विविध विभागा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना जनसामान्यापर्यंत पोहोचाव्या व प्रत्येक योजनेची माहिती नागरिकांना व्हावी त्यांना त्या योजनेचा लाभ घेता यावा व त्यातून गावाचा विकास व्हावा यासाठी एक दिवस गावकऱ्यासोबत हा नाविन्यपूर्ण उपक्रम माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत अजिंठा या ठिकाणी दिनांक 19 मार्च 2025 रोजी माननीय कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर प्रकाश पाटील, माननीय गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांच्या प्रमुख उपस्थितीत व सरपंच नजीर अहेमद शेख अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी विविध विभागाचे अधिकारी यांनी आपल्या विभागातील योजनांची माहिती जनसामान्यांना दिली व त्यांच्या अडीअडचणी समजावून घेतल्या व सर्वसामान्यांचा समाधान करण्याचा प्रयत्न केला यावेळी पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड विनोद चव्हाण, पंचायती विभागाचे विस्तार अधिकारी पंचायत साहेबराव शेळके, उप अभियंता पाणीपुरवठा आप्पासाहेब काटकर, उप अभियंता बांधकाम अशोक शाखावार, शाखा अभियंता पाणीपुरवठा गजानन जंजाळ, शाखा अभियंता बांधकाम पी टी चौधरी, विस्तार अधिकारी कृषी विश्वास बनसोडे, अंगणवाडी पर्यवेक्षिका वैशाली पाटील, गटसमन्वयक स्वच्छ भारत मिशन केशवकांत बुलबुले, अनिता तायडे ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर शिरसाठ तसेच सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिव व्याख्याते धिरेंद्र ठाकूर यांचे व्याख्यान,

## दुंदराई गावातील शेकडो शिवप्रेमींचे रायगडावर प्रस्थान

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

उरण तालुक्यातील पाणदिवे गावातील सुप्रसिद्ध शिवव्याख्याते सह्याद्री रत्न धिरेंद्र ठाकूर अभ्यासपूर्ण शिव चिंतनातून नुकत्याच झालेल्या १९ फेब्रुवारीच्या २०२५ च्या शिवजयंती निमित्ताने एकाच दिवशी पाच ठिकाणी व्याख्यानमालेतून शिव विचारांचा जागर घालण्यात आला.

गतवर्षी १९फेब्रुवारी २०२४ ला एकाच दिवशी चार व्याख्यान देण्याचं उल्लेखनीय काम त्यांच्या हातून झालं होतं. अगदी यावर्षीही त्यांनी एकाच दिवशी गाव आणि शहरात पाच ठिकाणी व्याख्यान देऊन शिवचरित्राचा जागर प्रभावीपणे मांडला. १९ फेब्रुवारीला २०२५ च्या शिवजयंती निमित्त प्रथम रायगड जिल्हा परिषद शाळा करवले, नंतर पेण -दादर तसेच पनवेल मधील सर्वात मोठी रहिवासी कॉलनी बालाजी सिंफोनी येथे, त्याच्यानंतर दुंदराई गावात व्याख्यान झाल्यानंतर करंजाडे पनवेल येथे निवेदनात्मक व्याख्यान देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तुत्वाचा, नेतृत्वाचा गौरवशाली इतिहास दाखले देऊन आपल्या अनोख्या शैलीतून त्यांनी प्रभावीपणे मांडला. छत्रपती शिवाजी महाराजांनी व त्यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले एक नव्हे तर चार स्वराज्य ,तसेच इतिहासातील दुसरी पावनखिंड, छत्रपतींचा साम्राज्य नव्हे स्वराज्य





,कोकण किनारपट्ट्यातील स्वराज्यासाठी खर्चिक पडलेले मावळे अशा विविध विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. यामध्ये दुंदराई गावात झालेल्या व्याख्यानात उपस्थित शिवप्रेमींना 'एकदा तरी रायगड किल्ला पहावा' असे अवाहन केल्यानंतर व्याख्यानातून प्रेरणा घेऊन गावातील लहान मुलं, विद्यार्थी, तरुण ,प्रौढ, शिवप्रेमी धरतीवरील स्वर्ग म्हणजे रायगड किल्ला भेट देण्यासाठी सज्ज झाले आणि त्यांनी शिवछत्रपतींच्या स्वराज्याविशेष म्हणजे दुंदराई गावातील ,रायगड जिल्हा परिषदेचे आदर्श ,प्रामाणिक आणि गुणवंत शिक्षक संतोष पाटील यांनी रायगडाला भेट देण्यासाठी पुढाकार घेऊन त्याचं नियोजन व संयोजन केले. सन्माननीय ग्रामस्थांनी ,दानशूर व्यक्ती, समाजसेवकांनी या स्तुत्य उपक्रमासाठी सर्वतोपरी मदत केली व त्यात सहभागी झाले होते.

## करंजगाव येथील गोदा पात्रातील पानवेलीसाठी बैलगाडा शौकिनांचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**

निफाड तालुक्यातील करंजगाव येथील गोदावरी नदीच्या पात्रात पानवेलीचा खूप मोठा विळखा पडलेला असल्याने गोदा पात्रातील पाणी दुषित झाले.जनावरांना पाणी पाजणे देखील मुश्किल झाले होते. पानवेलीनी काठापर्यंत वेढा घातला. असल्याने भाविकांची आंघोळीसाठी गैरसोय व्हायला लागली. डासांचा प्रभाव वाढू लागला असल्याने... तसेच गुढीपाडव्याला श्री. हनुमान यात्रा उत्सव असल्याने करंजगाव येथील बैलगाडा चालक मालक टांगा शौकीन तसेच श्री.हनुमान



यात्रा उत्सव समितीने एम .डी. एम. अर्थमुव्हर्स चे संचालक नंदू मोरे, मंगेश मोरे, सोसायटीचे चेअरमन संदिप कोटकर, यांनी पानवेली काढण्यासाठी पुढाकार घेतला. करंजगाव,कोठुरे ,चांदोरी ,चाटोरी हि गावे धार्मिक दृष्टीने महत्त्वाची असुन दर्शनासाठी भाविकांची नेहमी गर्दी असते..... काठोकाठ भरलेल्या पानवेली बघून भाविकांना संताप व्यक्त केला जात आहे .तरी शासनाने पानवेली काढण्यासाठी पुढाकार घेऊन पानवेली मुक्त स्वच्छ गोदावरी नदीसाठी पाऊल उचलावे अशी मागणी करंजगाव येथील टांगा शौकीन व जेष्ठ नागरिक, हनुमान यात्रा उत्सव समितीने केली आहे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.


daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# अपंग कल्याण' निधी : फक्त नावापुरता!
# ग्रामपंचायतींच्या कारभारावर प्रश्नचिन्ह!

## तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये दिव्यांगांच्या हक्कांवर डल्ला! 80% निधी पडून, 20% वापरला!

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**

घाटंजी - ग्रामपंचायतींमध्ये अपंग कल्याणासाठी निधीचा कमी वापर होत आहे हे लक्षात घेऊन अपंग व्यक्ती (प्रतिष्ठा, संधी आणि पूर्ण सहभागाचे संरक्षण) कायदा, २०१९ च्या कलम ४० नुसार, अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी राखून ठेवलेल्या पाच टक्के निधीचे व्यवस्थापन करण्याची महत्त्वाची जबाबदारी ग्रामपंचायतीवर सोपवण्यात आली आहे. १९ एप्रिल २०17 रोजी लागू झालेल्या अपंग व्यक्तींच्या हक्क कायद्याने, २०१६ या उपक्रमाला आणखी बळकटी दिली आहे, ज्यामध्ये सर्व स्थानिक संस्थांना या आवश्यक संसाधनांचे वाटप करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कायदेशीर आदेशांनंतरही, आमच्या कार्यक्षेत्रातील अनेक ग्रामपंचायतींनी या निधीचा प्रभावीपणे वापर केलेला नाही हे आमच्या लक्षात आले आहे.




चिंताजनक बाब म्हणजे, दिव्यांगांसाठी कोणतेही समर्पित खाते स्थापन केलेले नाही, ज्यामुळे गेल्या पाच वर्षांत वाटप केलेला निधी मोठ्या प्रमाणात खर्च न होता राहण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या निष्काळजीपणामुळे केवळ अपंग व्यक्तींचे हक्क कमी होत नाहीत तर समावेशकतेकडे आपल्या सामूहिक प्रगतीलाही अडथळा निर्माण होतो. ग्रामपंचायतींमध्ये अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी असलेल्या निधीचा कमी वापर हा एक गंभीर मुद्दा आहे ज्यावर त्वरित आणि एकत्रित कारवाईची आवश्यकता आहे. वाटप केलेल्या निधीपैकी २०% निधी वापरला जात आहे तर तब्बल ८०% निधी दुर्लक्षित आहे, त्यामुळे ही संसाधने अर्थपूर्ण उपक्रमांसाठी प्रभावीपणे वापरली जातील याची खात्री करण्यासाठी धोरणात्मक दृष्टिकोन स्वीकारणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या गंभीर समस्येचे निराकरण करण्यासाठी, त्वरित कारवाई करणे आवश्यक आहे:

समर्पित खाती स्थापित करा: प्रत्येक ग्रामपंचायतीने अपंग व्यक्तींसाठी राखीव असलेल्या निधीसाठी एक विशेष खाते उघडले पाहिजे. यामुळे पारदर्शकता सुनिश्चित होईल आणि खर्चाचे योग्य वाटप आणि ट्रॅकिंग सुलभ होईल

जागरूकता आणि प्रशिक्षण: या निधीच्या वापराचे महत्त्व पटवून देण्यासाठी ग्रामपंचायत सदस्यांसाठी कार्यशाळा आणि प्रशिक्षण सत्रे आयोजित करा. अशाच प्रकारच्या उपक्रमांचा समुदायावर सकारात्मक परिणाम झाला आहे अशा यशस्वी केस स्टडीजवर प्रकाश टाका. लक्ष्यित कार्यक्रम विकसित करा: स्थानिक संस्था आणि अपंगत्व समर्थकांशी सहयोग करून अपंग व्यक्तींच्या गरजा पूर्ण करणारे कार्यक्रम तयार करा, जेणेकरून निधीचा वापर प्रभावीपणे आणि अर्थपूर्णपणे होईल याची खात्री होईल. नियमित देखरेख आणि अहवाल देणे: या निधीच्या वापराचा नियमितपणे आढावा घेण्यासाठी एक देखरेख प्रणाली लागू करा. जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी आणि हाती घेतलेल्या उपक्रमांच्या परिणामाचा मागोवा घेण्यासाठी अहवाल यंत्रणा स्थापित करा. समुदाय सहभाग: लाभार्थी आणि त्यांच्या कुटुंबियांसह समुदायाच्या सक्रिय सहभागास प्रोत्साहन द्या, जेणेकरून त्यांच्या विशिष्ट गरजा ओळखता येतील आणि कल्याणकारी उपक्रमांच्या नियोजनात योगदान देता येईल. ही पावले उचलून, आपण हे सुनिश्चित करू शकतो की अपंग व्यक्तींचे हक्क कायम राहतील आणि त्यांना योग्य पाठिंबा आणि संधी मिळतील. हे निधी स्थिर राहू नयेत तर समुदायासाठी मूर्त फायद्यांमध्ये रूपांतरित होतील याची खात्री करणे ही आपली जबाबदारी आहे. चला, सर्वांसाठी अधिक समावेशक भविष्य घडविण्यासाठी एकत्र काम करूया, जिथे प्रत्येक व्यक्ती भरभराटीला येऊ शकेल आणि समाजात पूर्णपणे सहभागी होऊ शकेल.

---

# द•ख•ल

### शिवशक्ती मित्र मंडळ पनवेल यांच्यातर्फे रंगपंचमी निमित्त श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**


दिनांक १९ मार्च २०२५ रोजी शिवशक्ती मित्र मंडळ लाईन आळी पनवेल यांच्यामार्फत दरवर्षीप्रमाणे यावर्षीही रंगपंचमीच्या दिवशी श्री सत्यनारायणची महापूजा ठेवण्यात आली होती यावेळी नागरिकांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.यावेळी स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या स्पर्धकांना बक्षीसे देऊन सन्मानित करण्यात आले कारेक्रमला उपस्थित मान्यवर राजाभाऊ गुप्ते.स्वप्निल गुप्ते.रमेश गुडेकर(संस्थापक)सुनील पोतदार(पत्रकार)संजय कदम(पत्रकार) अरुण ठाकूर.संदीप पाटील (अध्यक्ष)रवी(पिंट्या) गोरे.नीता प्रदीप नरसाळे.अर्चना कुलकर्णी. खंडेश धनावडे.प्रकाश वाघे.संतोष तळेकर.समीर कदम.प्रवीण पोवार. अरुण ठाकूर.प्रशांत नरसाळे. अनिकेत जाधव.उपस्थित होते या कार्यक्रमाला पनवेल परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





### "संतोष लांडे यांची विभागीय सचिवपदी निवड"


**दैनिक युवक आधार**
**मुबंई विभाग प्रतिनिधी प्रमुख**
**, किशोर रमाकांत गुडेकर**
**कात्रज (पुणे), दि. 20 मार्च 2025**



राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पश्चिम महाराष्ट्र विभागीय सचिवपदी श्री. संतोष लांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. गणेश कचकलवार यांच्या आदेशानुसार झाली. या वेळी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष श्री. गणेश महाडिक यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. तसेच, पश्चिम महाराष्ट्र उपविभाग प्रमुख श्री. कांताभाऊ राठोड यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. मावळ तालुका अध्यक्ष श्री. गोपाळ भालेराव यांच्या शिफारसीमुळे श्री. लांडे यांची निवड करण्यात आली. नियुक्तीनंतर श्री. संतोष लांडे यांनी संघटनेचे आभार मानत सांगितले की, "राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या कार्याचा मी पूर्णतः पाठपुरावा करणार असून, पत्रकारितेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील समस्यांना वाचा फोडण्यासाठी कटिबद्ध राहीन." या निवडीबद्दल सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.संतोष लांडे यांची नियुक्ती झाल्याने ग्रामीण पत्रकारितेला नवा दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या पुढील कार्याला शुभेच्छा!"

### उलवे खाडीत आढळा अनोळखी मृतदेह

**दैनिक युवक आधार**
**उलवे वार्ताहर**



अनोळखी मयत इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे याची बॉडी संपुर्णपणे सडलेली पाण्यामध्ये तरंगत असताना मिळुन आली आहे वर्णन खालील प्रमाणे पुरूष इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे, उंची अंदाजे ५.५ फुट, अंगावर गोल गळयाचा पांढरा व हिरव्या रंगाचे बाहया असणारा टी शर्ट तसेच पायामध्ये ग्रे रंगाची पॅन्ट, वर्णन असून सदर इसमाची बॉडी फायरब्रिगेडच्या साहायाने बाहेर काढुन उपचाराकरीता उपजिल्हा रूग्णालय, पनवेल येथे नेली असता, तेथील डॉक्टरांनी तपासून १६:३० वा. मयत झाल्याचे घोषीत केले वरील इसमाची ओळख पटल्यास अथवा त्याचे बाबत काही माहिती प्राप्त झाल्यास संदीप पारखे, पोलीस उप निरीक्षक, उलवा पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्याशी संपर्क साधावा

### नवीन पनवेलमध्ये पाण्याचा अनियमित पुरवठा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

नवीन पनवेलमध्ये होणाऱ्या अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पाण्याविना अनेकांचे हाल होत आहेत. गेल्या एक-दीड महिन्यांपासून नवीन पनवेल शहरात अनियमित पाणीपुरवठा होत आहे. तर काही ठिकाणी माहिती न देता दोन ते तीन दिवस पाणीपुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. पूर्वी पाण्याची वेळ दुपारी एक ते चार अशी होती, मात्र आता एक ते दोन तर कधी तीन पर्यंत सुद्धा कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे शहरात राहणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे. मार्च महिन्यात ही परिस्थिती झाल्याने नागरिक पुरते हैराण झाले आहेत. आगामी एप्रिल आणि मे महिन्यात अशी परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी काय करावे असा प्रश्न त्यांना सतावत आहे. त्यामुळे योग्य ती उपाययोजना करून नियमित पाणीपुरवठा करावी अशी मागणी शरद पवार गटाचे महाराष्ट्र राज्य सचिव आदित्य जानोरकर यांनी सिडकोकडे केली आहे.

---

## छत्रपतीचा अवमान करणाऱ्या भाजप नेत्याची खासदारकी रद्द करा- संभाजी माळवदे

### काँग्रेससह विविध संघठणाकडून भाजपा सरकारचा निषेध

**दैनिक युवक आधार**
**(नेवासा प्रतिनिधी)-** लोकसभेमध्ये भाजप नेत्याकडून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान केल्याप्रकरणी आज काँग्रेससह बहुजन मुक्ती पक्ष, बसपा, व इतर संघटनाकडून निषेध करण्यात आला.



सविस्तर वृत्त असे की, देशात सत्ताधारी भाजपा पार्टीतील मोठ्या फळीतल्या नेत्याकडून रोज काही ना काही चिथावनीखोर वक्तव्य करून वादंग निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यात महान पुरुषांना देखील ओढवून घेण्याचे काम सोयीस्कररित्या हे नेते करताना दिसतात. सध्या दिल्लीत लोकसभेचे अधिवेशन चालू आहे या अधिवेशनात भाजपचे प्रदीप पुरोहित या खासदाराने पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मागच्या जन्मी छत्रपती शिवाजींचा अवतार होते. मोदी हे शिवाजी महाराजच आहे असे वक्तव्य केले. पुरोहित यांनी केलेल्या वक्तव्याचे पडसाद महाराष्ट्रभर पसरले असून ठीक ठिकाणी याचा निषेधही करण्यात आला. आज नेवासा तहसील कार्यालय येथे काँग्रेससह, बहुजन मुक्ती पक्ष, बसपा, व इतर संघटना कडून छत्रपतीचा अवमान केल्यामुळे प्रदीप पुरोहित व भाजपा सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी पुरोहित व भाजपा सरकार विरोधात निषेधाच्या जोरदार घोषणा देण्यात आल्या. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड हिंदुस्थानचे आराध्या दैवत असून त्यांचा अवमान आम्ही सहन करणार नाही ज्या खासदाराने असे वक्तव्य केले त्याची खासदारकी रद्द केलीच पाहिजे अशी मागणी केली.शहराध्यक्ष अंजुम पटेल यांनी देशातील अनेक प्रश्न वाढती गुन्हेगारी, महिलांवरचे अत्याचार, महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, बुडती अर्थव्यवस्था या प्रश्नापासून पळ काढण्यासाठी जाणून बुजून छत्रपतीं सारख्या महान पुरुषावर अवमान कारक वक्तव्य करून लोकांचे लक्ष भरकटविन्याचे काम भाजपा नेते करत आहे.तर गणपत मोरे यांनी छत्रपती हे अठरापगड जातींचे राजे होते. आपल्या वरिष्ठ नेत्याला खुश करण्यासाठी भाजपा नेते छत्रपतीविषयी रोज काही ना काही अवमानकारक वक्तव्य करत असतात. हा महाराजाचा अवमान नसून पूर्ण महाराष्ट्राचा अवमान आहे. जाती जातीमध्ये, धर्मधर्मामध्ये तिरस्काराचे विष कालवण्याचे काम भाजप नेते करत आहे असे स्पष्ट केले. यावेळी नेवासा तहसीलदार संजय बिरादार यांना निषेधाचे निवेदन देण्यात आले. निवेदनावेळी काँग्रेस अध्यक्ष आण्णासाहेब पटारे,सतीश तऱ्हाळ, गुलाब पठाण,बहुजन मुक्तीचे राम मगरे, मिन्हाज शेख, बसपाचे अध्यक्ष विकास चव्हाण, युवा नेते हरीश चक्रनारायण,सामाजिक कार्यकर्ते संजूभाऊ नारळे आदीसह आंदोलक उपस्थित होते.

## प्रदूषण विरहित दोन स्पीड बोटींमुळे जेएनपीए ते मुंबई प्रवास फक्त ३५ ते ४० मिनिटात होणार.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**





१९ डिसेंबर २०२४ रोजी गेट वे ऑफ इंडिया इथून एलिफंटा च्या दिशेने निघालेल्या नीलकमल नावाच्या बोटीला अपघात झाला होता आणि एका क्षणात होत्याचं नव्हतं झालं होतं या घटनेनंतर जलप्रवासाला नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाली होती. यानंतर जवाहरलाल नेहरू पोट च्या निर्देशक मंडळाने नवीन वर्षात लाकडी प्रवासी बोट बंद करण्याचा निर्णय घेतला.आणि नवीन वर्षात दोन स्पीड बोटींची जेएनपीएच्या गेटवेपर्यंतची सागरी प्रवासी स्पीड बोटींची शुक्रवारी ट्रायल घेण्यात येणार आहे. ती यशस्वी झाल्यानंतर ताबडतोब प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी मान्यता दिली जाणार आहे. या प्रदूषण विरहित स्पीड बोटींमुळे प्रवाशांना जेएनपीए ते मुंबई हा प्रवास अवघ्या ३५ ते ४० मिनिटांत करता येणार आहे . १९ डिसेंबर च्या एलिफंटा अपघातानंतर तसेच उरण ते नेरुळ, बेलापूर रेल्वे सेवा चालू झाल्याने जल प्रवासी संख्या कमी झाल्याने, त्याचप्रमाणे लाकडी बोटी या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून फारशा उपयुक्त नसल्याचे निदर्शनास आल्याने,जे एन पी ए चे अध्यक्ष उन्मेश वाघ यांनी प्रदूषण विरहित इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्यांवर चालणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञान सोई सुविधांनी सुसज्ज असलेल्या स्पीड बोटींचा पर्याय निवडला आहे. आणि त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी जेएनपीए प्रशासनाने काही महिन्यांपासून तयारी सुरू केली होती, यासाठी इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्यांवर चालणाऱ्या प्रदूषण विरहित अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर असलेल्या दोन फायबरच्या हलक्या स्पीड बोटी दहा वर्षाच्या कालावधीसाठी पुरवठा करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीला बोटीपुरवठा व हाताळणीचे काम दहा वर्षासाठी सुरू करण्यात येणाऱ्या स्पीड बोट सेवेसाठी जेएनपीए ने ३७ कोटी ८९ लाख ९४ हजार १९० रुपये खर्चाची तरतूद केली आहे. उन्हाळी दिवसात वीस ते पंचवीस प्रवासी व पावसाळी दिवसात दहा ते बारा क्षमतेच्या दोन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेल्या दोन स्पीड बोटी गेल्या फेब्रुवारी च्या सुरुवातीला वाहतुकीसाठी जेएनपीटीच्या सेवेत दाखल होणार होत्या मात्र तांत्रिक कारणांमुळे स्पीड बोट सेवा सुरू करण्यास विलंब झाला आणि आता शुक्रवारी त्यांची ट्रायल घेण्यात येणार असल्याची माहिती जे.एन.पी.ए.चे उपसंरक्षक कॅप्टन बाळासाहेब पवार यांनी दिली. या प्रवासाचा लाभ जास्तीत जास्त सागरी स्पीड बोट सेवा बंदरात कामकाजासाठी मुंबईतून येजा करणाऱ्या जे.एन.पी.ए.चे कामगार, प्रकल्पग्रस्त ,कस्टम, एअरफोर्स, सीआयएसएफ, आणि फॅमिली मेंबर्स ,फोर्ट युजर्स आदी कामगारांसाठी उपयुक्त ठरणार आहे आणि मुख्य म्हणजे प्रवासाचा त्यामुळे वेळही वाचणार आहे.

---

# बांधावरचे झाडही देते वर्षाला २० ते २५ हजार !!

## चिंच विक्रीतुनही मिळतो शेतकऱ्यांना पैसा....

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**

**शिरूरआनंतपाळ :** ऊन्हाळ्यात ऊन्ह लागू नये म्हणून शेतकरी शेतीच्या बांधावर विविध झाड सावलीसाठी लावतात. परंतु काही झाडे शेतकऱ्यांना सावली बरोबरच उत्पन्न मिळवुन देतात. त्यापैकी एक असलेले चिंच झाड वर्षाला २० ते २५ हजार रुपये मिळवून देत असत. येरोळ व परिसरातील गावात शेतीच्या बांधावर नदीकाठी आंबा, लिंब, शेवगा, जांभुळ, शिंदोळी व चिंचची वाडवडिलांनी लावलेली मोठ मोठ झाड दिसतात. पण आलीकडे दररोज मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याने आंबा व चिंचची झाडे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. तरीदेखील बांधावर असलेली चिंचची झाडे वर्षाला चिंच मालक शेतकऱ्याला २० ते २५ हजार रुपये सहज मिळवुन देतात.



यामध्ये आंबा, जांभुळ व चिंचचा समावेश आहे.चिंचच झाड थंड सावली तर देतेच पण शेतकऱ्यांना वर्षाला आर्थिक उत्पन्न देत. या झाडाची दोन तीन वर्ष काळजी घेतल्यास वर्षानोवर्ष हमखास उत्पन्न मिळत.

**एका हंगामात तीन ते चार क्विंटल माल...**

वाडवडीलांनी सत्तर ऐंशी वर्षापुर्वी शेताच्या बांधावर लावलेली चिंचची मोठमोठी झाड वर्षाला आठ दहा क्विंटलच्या वर उत्पादन देतात. व्यापारी चिंच उत्पादक शेतकऱ्याकडुन झाडावरिल चिंच पाहुन एका हंगामाची चिंच ठरऊन विकत घेतात.

**खत,पाणी फवारणी शुन्य....**

चिंचच्या झाडावर नुकसान कारक किंवा किडीचा प्रार्दुभाव होत नाही परंतु काहीवेळा खोड अळीच्या नियंत्रणासाठी झाडाच्या खोडाच्या छिद्रात पेट्रोल किंवा रॉकेलचा बोळा टाकुन ते छिद्र माती टाकुन बंद करतात. या चिंचच्या झाडाला दोन तीन वर्ष सांभाळ केल्यास वर्षानो वर्ष ऊत्पन्न देणारे हे झाड आहे.

**हलक्या जमीनीतही पैसाच पैसा....**

चिंचच्या झाडाला पाणी कमी लागते. झाड मोठे असल्याने माणसांना तसेच मुक्या जनावरांना सावली देते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या पडीक जमीनीमध्ये बांधावर, नदीकाठच्या शेजारी हि झाडे लावावेत शिवाय शासन फळबागा करणाऱ्यांना अनुदान देत असते शिवाय यासाठी खर्चही शुन्य आहे त्यामूळे शेतकऱ्यांनी चिंचची झाडे लावावीत असे कृषी साहाय्यक श्रीमती एम.ओ.मोदी यांनी सांगितले.

**२० हजार एका झाडाचे उत्पन्न..**

शंभर सव्वाशे वर्षापुर्वी लावलेल्या झाडापेक्षा ४० ते ५० वर्षापुर्वी ची झाडे अधिक उत्पादन देतात. त्यामूळे सरासरी एक झाड वर्षाला २०हजार रुपये सहज मिळवुन देते. शिवाय मार्च ते मे महिण्यापर्यंत झाड झुडपणे, चिंचा गोळा करणे, फुल तयार करणे यामध्ये अनेक तरुंणाना रोजगार तर महिलांना प्रतिकिलो पंधरा रुपये चिंचा फोडण्यासाठी मिळत असतात. सध्या दहावी बारावीच्या परिक्षा संपल्या असुन अनेक विद्यार्थी चिंचा फोडण्यासाठी आई वडीलाना मदत करत आहेत.

---

### अनेकता असूनही एकता : पनवेलने दाखवली सामाजिक सलोख्याची ताकद !



**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल शहराने पुन्हा एकदा सर्वधर्म समभावाचा आणि एकतेचा आदर्श निर्माण केला आहे. यंदा रमजानचा पवित्र महिना आणि होळी सणांचे एकाच वेळी आगमन झाले असताना, शहरात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यात पनवेल शहर पोलिसांना मोठे यश मिळाले. या महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांचा मुस्लिम बांधवांनी जाहीर सन्मान केला. मागील काही घटनांमुळे पनवेलमधील वातावरण काहीसे तणावपूर्ण बनले होते. अशा परिस्थितीत रमजान आणि हिंदू सणांचे एकत्र येणे हे पोलिसांसाठी मोठे आव्हान होते. मात्र, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी उत्कृष्ट नियोजन आणि प्रभावी धोरणे अंमलात आणून शहरात शांतता आणि सलोखा कायम ठेवला. त्यांच्या या प्रयत्नांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेचो भावना वाढली. या शांततापूर्ण बातावरणासाठी मुस्लिम समाजातील नागरिकांनी एकत्र येत वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या कार्याची दखल घेतली. पनवेल एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन इकबाल काशी यांच्या नेतृत्वाखाली नवीद पटेल, फक्कू मुबारक, पत्रकार डॉ. मुनीर तांबोळी, पत्रकार हनीफ कच्छी, पत्रकार वसीम पटेल, मुद्दसिर पटेल, मन्सूर पटेल, इम्तियाज बेग, उबेद पवार, जबाद काझी, इस्माईल तांबोळी, संतोष पवार, सलमान मुकादम यांच्यासह अनेक मुस्लिम बांधवांनी ठाकरे यांना शाल आणि पुष्पगुच्छ देऊन आपली कृतज्ञता व्यक्त केली.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीच्या माध्यमातून कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकतीचे विद्यमान मालकांकडून (श्री रामचन्द्र पांडुरंग जमादार व सौ. संगीता रामचन्द्र जमादार) करार करुन विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

फ्लॅट न. २०३, दुसरा मजला, एफ- विंग, ओमकार ब्रम्हा को. हौ. सो. लि. सर्वे न. १४३/१, १४४/३, व १४४/४ मौजे. आदई, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड क्षेत्रफळ ३७.१७ चौ.मि. कारपेट एरीया

सदरची मिळकत ही वरील मालकाची निर्वेध मालकी हक्काच्या प्रत्यक्ष तावेकब्जात वहिवाटीतील असून ती विक्री करण्याचा त्यांना हक्क व अधिकार असल्याने त्यांनी सदरच्या मिळकतीचे पुर्ण हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्यासाठी ठरवीले आहे.

तरी वर वर्णन केलेली मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळहिवाट, गहाण, बक्षिसपत्र, चार्ज, लीज, ॲटॅचमेंट, लीन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नाटीस प्रसिद्ध झालेपासून दिवसांचे आत खालील सही करणार खालील दिलेल्या पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत/तकार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मालकाबरोबर विक्री करार करतील. याची नोंद घ्यावी.

**दिनांक :-१८/०२/२०२५**
**ठिकाण :- पनवेल**
**सही. ॲड. किशोर टोम्पे**
**रुम नं.०४, बी-विंग, सिम्फोनी को. हौ. सोसायटी लि. प्लॉट नं.३१, सेक्टर-३, नवीन पनवेल. जिल्हा - रायगड पिन - ४१०२०६.**
**मो. नं. ९८२०३७३८२८**

### नमुना एन डी
### (नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH 2023-CC-4914Aमध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46BP 3934 याचं तारीख 18/09/2024रोजी निधन झाले आहे.

**मी श्रीमती**
**नूतन विश्वनाथ वास्कर**
कुंटेवहाळ रायगड.महाराष्ट्र 410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**नूतन विश्वनाथ वास्कर**
**कुंटेवहाळ रायगड,महाराष्ट्र -410206.**

### नमुना एन डी
### (नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH /46/CC/AUTO/2019/2951मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46BD5846 याचं तारीख 22/12/2024 रोजी निधन झाले आहे.

**मी श्रीमती**
**बेबीबाई बारकू पाटील**
चिखले ता - पनवेल,महाराष्ट्र रायगड- 410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**बेबीबाई बारकू पाटील**
**चिखले ता -पनवेल,महाराष्ट्र रायगड -410206.**

# आनंदाचे झाड पंढरी पंढरीनाथ हिवराळे यांचा प्रेरणादायी जीवन प्रवास

## कचरू चांभारे लिखित मायेचे छत्र काळजातील मित्र ही लेखमाला दैनिक युवक आधार ने सुरू केलेले आहे त्यातील तृतीय लेख

**दैनिक युवक आधार**

तेलंगणा राज्याच्या सीमेवर धर्माबाद बिलोली तालुके येतात.महाराष्ट्राची जीवनदायिनी गोदावरी याच तालुक्यातून पुढे आंध्र तेलंगणात जाते.निजामकालीन राजवटीत ही दोन्ही शहरे महत्वाची बाजारपेठ त्याच बरोबर महत्वाची ठाणी होती.धर्माबाद व बिलोली या दोन्ही तालुक्याची एकत्रित आठवण होण्याचे कारण म्हणजे मायेचे छत्र देणारा काळजातला एक मित्र याच भूमीतला आहे.तो मित्र आहे पंढरी हिवराळे.पंढरीचे पूर्ण नाव पंढरी आनंदा हिवराळे.वृक्ष छाया देतो,वृक्ष माया देतो.वृक्ष अन्न देतो.हवेची ताजगीसुद्धा वृक्षच.परोपकारी वृक्षाच्या परोपकारातून उतराई होण्याची भाषा कोणी बोलू नाही कारण त्या उतराईतून आपण बाहेर येऊच शकत नाही.वृक्षाचे सारे परोपकारी गुण घेऊन जन्माला आलेल्या पंढरीची ही कथा आहे.त्याला आनंदाचे झाड हे विशेषण लावले कारण पंढरी स्वतः वृक्षागत आहे व त्याच्या वडिलांचे नाव आनंदा आहे.मनुष्यदेही पंढरी हा झाडाला नरदेह देण्याचे श्रेय त्यांच्या वडिलांचे म्हणजेच आनंदाचे होय.बीजातून एक अंकुर रूजतो,नवजात कोवळ्या अंकुराचे संरक्षण करण्याची भूमिका बीजाचे आवरण करत असते. एकदा का नव्या अंकुराने जोम धरला की जन्म दिलेले बीजावरण वातावरणात नष्ट होऊन जाते.पंढरी हिवराळेची कथा अशाच वळणाची आहे.आईवडील हे मुल नावाच्या अंकुराचे कवच असते. पंढरीचे कर्तृत्व अजून पसरले नव्हते पण विजयी लालीचा रथ नेमकीच कोवळीक उधळण करत उधळू लागला होता ,तोच आधी आई व बरोबर एक वर्षाने वडील अनंतात विलिन झाले. बीजाने आपला अंकुर मजबूत करून बीजावरण वातावरणात शांत झालं होतं. पंढरी हे झाड लाऊन आनंदा सुभद्रा ही जोडगोळी अनंताच्या दिशेने गेली होती अन् मागे उरले होते उरात दुःखाचा डोंगर घेऊन आनंदाचे झाड पंढरी. पंढरीची कथा सुरू तोरणा या गावातून. बिलोलीच्या पश्चिमेला वीस किमी अंतरावर तोरणा हे गाव आहे.शिवराय छत्रपतींचे तोरणा व हे तोरणा वेगळे. दोन्ही तोरणांचा जवळून संबंध नसला तरी बिलोली तालुक्यातील तोरणाची डोंगरावरील वसती दुर्लक्षून चालत नाही. तोरणाच्या भोवतालचा परिसर गोदावरी खो-याचा भाग आहे.सुपीक काळ्याशार जमीनीचा अखंड पट्टा म्हणजे हा परिसर आहे.या परिसरातील अनेक गावे सपाट जमीनीवरच वसलेली आहेत.अपवाद आहे ते तोरणा.छोट्याशा टेकडीवर जेमतेम हजार बाराशे लोकवस्तीचे ,शेसव्वाशे उंबरठा असलेले हे तोरणा गाव.तोरणा गावी 1978 साली सुभद्रा आनंदा हिवराळे मायबापाच्या पोटी पंढरीचा जन्म झाला.

त्या काळातलं तोरणा गावातलं बागायती शेती असलेलं ,सधन व विशाल असं एकमेव कुटुंब म्हणजे पंढरीचे वडील आनंदा हिवराळे.पंढरीच्या वडिलांचे तीन भाऊ ,आई वडील ,दहा बारा मुले असे तीस बत्तीस व्यक्तींचे संयुक्त कुटुंब. श्रम व कार्यक्षेत्र समांतर विभागलेले असल्यामुळे भावाभावात कलह नव्हता. पंढरीचे सर्वात मोठे चुलते कायम सरपंच असत ,त्यांची गावावर छान पकड होती. ते पूर्णवेळ राजकीय कार्यकर्ते होते.दुसरे चुलते नामांकित मल्ल होते.कुस्तीच्या छंदापायी शेतातल्या काळ्या मातीशी त्यांचे नातं जुळले नाही आन् कुस्तीच्या फडाने त्यांना सोडले नाही.तिसरे चुलते व्यावसायिक कल असलेले होते.गावात त्यांचे किराणा दुकान होते.उरले ते पंढरीचे वडील,ते पूर्णवेळ शेती करत. केळी,ऊस इतर नगदी पिकांची कायम शेती ते करत.चार भावंडात पाचच एकर शेती होती,पण भरघोष पीक देणारी बागायती शेती व इतर भावांचे वेगवेगळे व्यवसाय असल्यामुळे लहानमोठ्या तीस बत्तीस लोकांचे कुटुंब असूनही आर्थिक चणचण नव्हती.

पंढरीचे आई वडील शेतातच राहत असल्याकारणाने ,त्याला लहानपणापासून शेतातले मुक्त वातावरण मिळाले होते. जेव्हा पंढरी शाळेत जाण्यायोग्य झाला ,इतर चुलत भावंडासोबत त्याने शाळेत जावं.असं सर्वांनाच वाटत होतं पण शेतीतल्या केळीच्या बागेशी,ऊसाच्या पात्याशी त्याची नाळ इतकी घट्ट होती की तो शाळेत जायलाच तयार होईना. पंढरी व त्याचा एक आतेभाऊ शाळेची वेळ झाली की शेतात लपून बसत असत.बागायती शेतीमुळे त्यांना लपायला मुबलक जागा होती.आत्याचे पती बाल पंढरीला व आतेभावाला शोधून खांद्यावर घेऊन शाळेत नेऊन सोडत. पहिली व दुसरीचा प्रवास असाच झाला. पंढरीच्या आयुष्यातला पहिला टर्निंग पॉईंट तो तिसरीत असताना घडला. त्यावर्षी तोरणाच्या प्राथमिक शाळेत साळुंके सर नव्यानेच आले होते.साळुंके सरांचे नोकरीचे तोरण तोरण्याच्या शाळेपासूनच बांधले.गुरूजीची नोकरी व पंढरीचे प्राथमिक शिक्षण या दोहोंचा आरंभ तिथूनच झालेला.सरांचे प्रत्येक मुलांकडे वैयक्तिक लक्ष होते.तिसरीला आला तरी पंढरीला वाचन तेवढे जमत नव्हते.गणितासंगेही सूत्र जुळत नव्हते. शिक्षा व प्रेम या दोन्ही प्रकारे लसीकरण करून सोळंके सरांनी पंढरीला रूळावर आणले.प्रसंगी रूळावर आणण्यासाठी रूळाचा वापर केला व पंढरी सुतासारखा सरळ झाला.तिथून पुढे पंढरी अभ्यासाला लागला.वाचन चांगलं जमू लागलं.पाठीवर मारासाठी पडणारा गुरूजीचा हात आता शाबासकीसाठी पडू लागला.जशीजशी शाबासकी मिळू लागली तशीतशी अभ्यासाची व शाळेची गोडीही वाढू लागली.चौथी बोर्ड परीक्षा चांगल्या गुणांनी तो उत्तीर्ण झाला.तोरणा गावात चौथीपर्यंतच शिक्षणाची सोय होती. पुढील शिक्षणासाठी राहेर गाठावे लागले.

तोरण्यापासून अवघ्या दोन किमी अंतरावर राहेर आहे.राहेर हे गाव गोदावरीच्या तीरावर असून धार्मिक तीर्थक्षेत्र आहे.नृसिंहाचे भव्य हेमाडपंथी मंदीर व श्री.चक्रधर स्वामींच्या पदस्पर्शाचा इतिहास राहेरला आहे. राहेरला देवाचे माहेर म्हणत.पुढे चालून माहेरचे राहेर झाले असावे.याच राहेरगावी पाच मोठ्या वडांच्या झाडांचा समुह होता. पाच झाडांच्या समुहामुळे वटवृक्षाची विशालता लाभलेली होती.नांदेडचे माजी खासदार तथा शिक्षणमहर्षी स्व.गंगाधर कुटुंरकर यांनी राहेरात शिक्षणाची गंगा आणलेली आहे.पाच वडाच्या वैभवाने नटलेल्या राहेरगावच्या शाळेला त्यांनी पंचवटी विद्यालय असे नाव दिलेले आहे. या पंचवटी विद्यालयात पंढरी पाचवीत दाखल झाला.

1983- 84 साली राहेरला पुराचा तीव्र पुराचा फटका बसला.तसं गोदामाई दरवर्षीच दुथडी भरून वाहत असताना थोडंफार नुकसान करतच असे पण तीच तारणहार व जीवनवाहिनी असल्यामुळे तिनं केलेलं नुकसान ,ती करत असलेल्या उपकाराच्या तुलनेत अत्यंतिक छोटं होतं. पण 1983 साली गोदामाई राहेरकरांच्या शेतात अंगणात इतक्या जोशात नाचली की उपकारकर्तीचा तो फटका राहेरकर सहन करू शकले नाहीत.घरादाराचे ,शेतीचे अतोनात नुकसान झाले होते. त्यावेळी राहेरच्या पुनर्वसनाचे काम सुरू झाले.राहेरचे पुनर्वसन पंढरीसाठी शैक्षणिक पुनर्वसन ठरले.त्याकाळी शिक्षक लोक तालुक्याच्या जिल्ह्याच्या ठिकाणाहून ये जा करणारे नसत.सहसा नोकरीच्या गावीच त्यांचं ठाणं असे. पुनर्वसनामुळे शिक्षकांच्या निवासाचा प्रश्न आला.योगायोग म्हणजे तोरणा गावच्या एकमेव पहिल्या शिक्षकाने भविष्य समजल्यागत अनेक खोल्यांचे बांधकाम केलेले होते.राहेर ते तोरणा अंतर दोन कि.मी. असल्यामुळे पंचवटी विद्यालयातील बरेचसे शिक्षक तोरण्यालाच राहू लागले.देशमुख सर व सुजलेगावकर सर यांचा पंढरीला विशेष लळा लागला.पंढरीही सरांना घरातील छोटीमोठी कामे करू लागत असे.कामे संपले की सर त्याचा अभ्यास घेत असत.सातत्याने गुरूजनांचा सहवास लाभल्यामुळे पंढरी पार बदलून गेला होता.भोवतालच्या दहापाच खेड्यातील मुलांचा भरणा असूनही ,हुशार म्हणून गणल्या जाणा-या पहिल्या पाचात तो वरचा असे.या हुशारीमुळे तो पाचवी ते दहावीचे प्रथम सत्र वर्गनायक राहिला. दहावीच्या वर्षी वर्गनायकाची निवडणुक ,मोठ्या निवडणुका होत्या तशी झाली. सधन शेतक-याचा मुलगा असल्यामुळे पंढरीला त्याचे मित्र मामलेदार म्हणत. पंढरी स्वतः निवडणुकीत उभा नव्हता पण त्याने ज्या मुलास उभे केले होते त्याच्यामागे मालदार म्हणून पंढरीच तर होता.दुर्दैवाने सोळा वर्षीय उसळत्या तारूण्याने शाळकरी मुलांचा घात केला. राजकीय वारसा असलेल्या मातीत मुरलेली ही पोरं शालेय निवडणुक भलतीच मनावर घेऊन लढत होती. दोन गटात तुंबळ हाणामारी झाली अन् शाळेला गालबोट लागले.सर्व मुलांना समजावून सांगून त्या वादावर पडदा टाकला पण पंढरीसारखा हुशार विद्यार्थी भांडणतंट्यात वाहून जायला नको म्हणून सरांनी त्याला वैयक्तिक एकट्याला विशेष समज दिली.त्याकाळी दहावी परीक्षा बोर्ड परीक्षा असे व दहावीला प्रतिष्ठेचे वलय असे.शिक्षणाच्या मोकळ्या आकाशात झेप घेण्याचा टेक आफ म्हणजे दहावी.इथला टेक आफ ,आफ झाला तर मुलांची शैक्षणिक कारकीर्द भरकटलीच म्हणून समजा. आज्ञाधारक पंढरीने गुरूजींची शिकवण आज्ञा म्हणूनच शिरोधार्य घेतली व डोक्यात पुस्तकात व पुस्तकात डोके याशिवाय डोक्याला दुसरे कामच ठेवले नाही.वेळूच्या बनात ,चिंचेच्या झाडाखाली तर कधी कधी रस्त्यालगतच्या पुलाखाली मोठ्या नळीत तो अभ्यास करू लागला. त्याची ही अभ्यासाची पद्धत म्हणजे एक प्रकारची वनातली साधनाच होती.त्याच्या परिश्रमाचे फळ त्याला मिळाले.81 % गुण घेऊन तो उत्तीर्ण झाला.

नव्वदीच्या दशकात लातुर शैक्षणिक पटर्नचा खूप बोलबाला होता.लातुरला शिकायला जाणं व तिथं शिकायला मिळणं हे गुणवत्तेसोबत प्रतिष्ठेचे समजले जात असे.उत्तम गुणाची शिदोरी व आर्थिक सधनता सोबतीला असल्यामुळे पंढरीने अहमदपूरच्या महात्मा गांधी महाविद्यालयात अकरावी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला.कॉलेजच्या वातावरणात तो रूळतो न रूळतोच ,तोच इकडे घराकडे कुटुंब विभक्तीचे वादळ सुरू झाले होते. आजी आजोबा ,वडिलांसह तीन चुलते ,भावंडे असा तीस बत्तीस लोकांचे एकजीव कुटुंब विभक्तीच्या वादळाने हलू लागले होते.खूप वर्षाची एकसंघता अखेर भंग झाली व पंढरीच्या वडिलांसह चारही भाऊ आपापल्या लेकरांसह वेगळी निघाली.पाच एकर शेतीचे चार हिस्से झाले.पंढरीच्या वडिलांनी शेतीशिवाय इतर कोणतेच काम केलेले नसल्यामुळे त्यांच्याजवळ शेतीशिवाय पर्याय नव्हता व सव्वा एकर शेती चार लेकरांचा खर्च पेलू शकत नव्हती. विभक्तीचे वादळ अशा वेळेस उफाणलं होतं की नेमकं त्या वेळेस पंढरी व पंढरीचा मोठा भाऊ उच्च शिक्षणाच्या उंबरठ्यावर होते.दोन बहिणींचे शिक्षणही चालू होते व त्यांच्या पाठवणीचे विचारही आईवडिलांच्या डोक्यात होते.पंढरी तर अकरावीत दाखल झाला होता.बाळाने बाळसं धरण्याचा काळ त्याला जुलाबाची लागण होण्याचा काळ एकच यावा अन् बाळ उभरतं होण्याऐवजी गर्भगाळित व्हावं तसा पंढरी घरच्या ओढाताणीमुळे गलितगात्र झाला. शिक्षणाचा खर्च झेपत नसल्याचे लक्षात येताच ,पंढरीला धर्माबादला ठेवायचे ठरवले.घरातल्या प्रतिकूल परिस्थितीचा पंढरीवर विपरित परिणाम झाला.त्याची शारीरिक ठेवण लहानपणापासूनच हडकुळी होती.अभ्यास ,घरातले वातावरण यांमुळे तो अधिकच कोमेजून गेला.लहानपासून सुबत्ता पाहिलेली व अनुभवलेली असल्यामुळे ,अचानक आलेला चणचणीचा काळ चिंताजनक होता.आई वडील सव्वा एकरातच खपत होते अन् पुढे आपल्या लेकरांना शेतात खपायची वेळ येऊ नये म्हणून चिंतीत होते.तीव्र ओढाताणीतच पंढरीची बारावी पार पडली.बारावीस त्याला 1995 साली 72 % गुण मिळाले होते.त्यावेळी सरकारी नोकरी मिळण्याची हमी म्हणजे डी.एड्. अभ्यासक्रम असं त्यावेळी वातावराण होतं.पंढरीला नोकरीची सक्त गरज होती.बारावीचे 72 % गुण त्याला नोकरीचे प्रवेशद्वार उघडून देणार होते. त्याने मराठवाड्यातल्या स्व जिल्हा नांदेडसह ,औरंगाबाद,लातूर ,बीड ,परभणी ला डी.एड्.अभ्यासक्रमासाठी फॉर्म भरले.त्यावेळी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन असे फॉर्म भरावे लागत असत.पण दुर्दैव असे की मंदीरात गर्दीच्या रांगेत उभे असताना किंवा बँकेत रांगेत उभे असताना नेमका आपला नंबर यायला दोन तीन मिनिटाचा अवधी असतानाच मंदीर किंवा बँक बंद होते. अशावेळी हताश होऊन पाहत बसणं एवढंच आपल्या हाती असतं.नेमकं पंढरीच्या बाबतीत तेच घडलं,जिथं जिथं त्याने फॉर्म भरले होते ,तिथं तिथं त्याला अवघ्या एक दोन मार्काच्या फरकाने चुकवलं होतं व डी.एड्.प्रवेशाची दारं बंद केली होती.संवेदनशील व हळव्या पंढरीवर या गोष्टीचा खूप परिणाम झाला.कोकण विदर्भात साठ टक्के गुणांची मुले डी.एड्ला लागली होती. मराठवाड्याच्या बाहेर फॉर्म भरले असते तर नक्कीच संधी मिळाली असती पण होऊन गेलेल्या घटनेला जर तरच्या भाषेत मोजण्यात काहीच अर्थ नसतो. एक वर्ष असंच वाया जाणार होतं. या काळात त्याने बी.एस्सीला प्रवेश घेतला.परंतु मुख्य उद्देश डी.एड् व नोकरी असल्यामुळे बी.एस्सी.तेवढी पचनी पडत नव्हती.आईवडिलांचे कष्ट आठवून आठवून तो बारावीचे गुणपत्रक डोळ्यासमोर ठेऊन ढसाढसा रडत असे.वर्षभरात तो कितीतरीवेळा रडला असेल.बघता बघता वर्ष सरून गेलं.97 साली पुन्हा डी.एड्ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली.मागच्या वर्षीचा पश्चाताप पुन्हा भोगायला नको म्हणून यावर्षी त्याने राज्यातल्या वीस बावीस ठिकाणी डी.एड्.प्रवेशासाठी अर्ज केला.यावर्षी मात्र प्रवेशाने त्याला हुलकावणी दिली नाही.चंद्रपूर जिल्ह्यात डी.एड्. प्रवेशासाठी त्याची निवड होऊन त्याला जनता अध्यापक विद्यालय मिळाले.

डी.एड्ची दोन वर्षे संपली की आपल्याला नोकरी मिळणार व घराची दैना हटणार हा विचार सातत्याने खूप सुख देत होता.याच काळात पंढरीला जीवाभावाचे मित्र मिळाले.कमी अधिक फरकाने सर्वांची परिस्थिती अशीच होती.त्यामुळे समान वेदनेच्या नाळेतून मैत्रीचा बंध घट्ट झाला.प्रस्तुत लेखकासह इतर मित्रांचा सहवास एवढा हवाहवासा वाटू लागला की सणानिमित्त गावाकडे मित्र निघाले की पंढरी अक्षरशः ढसाढसा रडत असे.मैत्रीतला सुवर्णकाळ असलेली ही दोन वर्षे भुर्रकन निघून गेली. एप्रिल नव्याण्णव साली अंतिम परीक्षा उंबरठ्यावर असतानाच पंढरीच्या आईला सुभद्रामातेला सर्पदंश झाला अन् तो कालसर्प तिच्यासाठी काळ ठरला.जिच्या कष्टाचे झाड फळाले आले होते,त्या झाडाची फळे न बघताच ती निघून गेली होती.पंढरीसाठी मातृवियोगाचा धक्का खूप भयंकर होता.दुःखावर पांघरून घालत ,त्याने डी.एड्ची परीक्षा दिली.सप्टेंबरमध्ये निकाल लागला.चांगल्या गुणांनी तो पास झाला होता.हातात गुणपत्रक होते पण घरात आई नव्हती.भिंतीवरल्या फोटोतून आई पंढरीकडे कौतुकाने पाहत होती पण कौतुकासाठी शब्द उच्चारू शकत नव्हती.पहाटपासून आईने उपसलेले कष्ट ,चुलीजवळ बसलेली आई आठवली की पुन्हा हुंदका येई व पंढरी ओक्साबोक्सी रडू लागे.

डी.एड्.चा मार्कमेमो म्हणजे नोकरीच्या देवाला भेटायचा पास.हा पास हाती असल्याचा आनंद होता.जागा निघण्याचा अवकाश की नोकरी लागलीच समजा या वातावरणात आनंदाने दिवस सरू लागले होते. आई गेल्यामुळे तिची उणीव भरून काढण्यासाठी पंढरीने लग्न करावे असा वडीलांसह आजीआजोबांचा आग्रह होता.नोकरी लागल्याशिवाय पंढरीला लग्न नको वाटत होते पण घरातलं दुःखाचे सावट व वडिलधा-यांचा आग्रह त्यामुळे त्याला विवाहवेदीवर उभे राहावे लागले. धर्माबाद येथील सविता मोरे या गुणी मुलीशी त्याचा विवाह घडून आला. सविताचे पितृछत्र हरवलेले होते अन् पंढरीचे मातृछत्र हरवलेले होते.दुःखाचा सागर दोघांच्याही उरात अगदी समसमानपणे भरलेला होता.वेदनेचे समान भागीदार या नात्याने दोघांचाही एकमेकांवर खूप जीव जडला.सविता ही लौकिक अर्थाने पंढरीची रखुमाई असली तरी भावनिकदृष्ट्या ती माई चंद्रभागाच होती.नोकरी लागायला अवकाश होता ,त्या वर्षभरात सविता पंढरी ही जोडी वडिलोपार्जित शेतात रमली होती.ज्या शेतात आईच्या पावन स्मृती होत्या.प्राथमिक शिक्षण घेत असताना शाळेच्या भीतीने जेव्हा जेव्हा पंढरी शेतात लपून बसत असे तेव्हा तेव्हा आई बांधावर उभी राहून आवाज देत असे.पण बाल पंढरी शाळेच्या भीतीने आईच्या हाकेला ओ देत नसे. आता सुखाच्या उंबरठ्यावर उभे राहून पंढरी आईला आवाज देत होता पण आई हाकेला ओ देत नाही.सगळ्या भावंडाला आईने शेतात चुलीवर ,तेव्हा नव्यानेच आलेल्या गोबर गस शेगडीवर स्वयंपाक करून खाऊ घातलेले.आता ती जागा सविताने घेतली होती.आई जाऊन बरोबर एक वर्ष उलटले.दुःखाचा डोंगर हलका झाला नव्हता ,रीत म्हणून कसेबसे स्व.आईचे पहिले वर्षश्राद्ध केले होते. वर्षश्राद्ध होऊन वीस बावीसच दिवस उलटले असतील की एके दिवशी पंढरीच्या वडिलांना म्हणजेच आनंदा हिवराळे यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला.वळीवाच्या पावसात रसरस झाडावर वीज कोसळावी अन् रसरस झाड जळूनखाक व्हावं तसा दुःखाचा मोठा लोळ पंढरीवर कोसळला होता.ज्या आनंदाने पंढरी नावाचे झाड लावले होते ,ते दोन्ही हात निघून गेले होते.भयंकर दुःख अन् भयंकर दुःख हेच काय ते पंढरीच्या वाटेला आले होते.आईच्या जाण्याचा दुःख डोंगर शिरावर असतानाच बाप नावाचा पर्वतही त्याच डोक्यावर आकस्मिकपणे कोसळला होता. दुःखाच्या दरडीखाली पंढरी सविता ही नवीन जोडगोळी चेपून गेली होती. भयंकर दुःखातून सावरत असतानाच पंढरीच्या वडिलांच्या जाण्याने खचलेली त्यांची आई म्हणजे पंढरीची आजी मुलगा व सुनबाईचं जाणं पेलवू शकली नाही.वर्षभराच्या आत ती सुद्धा गेली.या आजीचा पंढरीवर विशेष जीव होता.आजीचे जाणं पंढरीसाठी वेदनेवर वेदनेचा डोंगर चढवल्यासारखे होते.


अशा दुःखात असतानाच पंढरीला शिक्षक म्हणून नांदेड जि.प.ची नोकरी मिळाली होती.त्याच्यासाठी नोकरी हा सर्वोच्च क्षण होता.या नोकरीसाठी त्याने प्रचंड मेहनत घेतली होती अन् त्याच्या मेहनतीचा पाया आईवडिलांच्या अपार कष्टावर उभा होता.नोकरीच्या रूपाने आनंदाचे झाड अंगणात उगले होते पण झाड लावणारा आनंदा हयात नव्हता. काळाच्या महिमेपुढे माणुस तोकडा आहे. दुःखाचा पहाड बाजूला सारून पंढरी यी सावरला आहे. नोकरीत स्थिरावलेला पंढरी सध्या सामाजिक व शैक्षणिक कार्यात रमला आहे.स्वतः अडचणी भोगलेल्या असल्यामुळे तो दुस-याच्या अडचणीत लवकर धाऊन जातो.मित्र वर्तुळातलं कुणाचेही दुःख त्याला पाहवत नाही.कुणाच्याही डोळ्यात अश्रू नसावेत यासाठी तो धडपडत असतो.धर्माबाद या शहरात प्रचंड ओढाताण सहन करत शिक्षण घेतले ,आज त्याच शहरात त्याचे दुमजली घर आहे.एकंदरीत आनंदाचे झाड आनंदाने डौलत आहे.



कचरू चांभारे बीड

## उलवा परिसरातुन महिला बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**उलवे वार्ताहर**



सौ. पुनमदेवी नानु चौहान, वयः- ४० वर्षे, ०७/०३ / २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास राहते घरातुन कोणालाही काहीएक न सांगता निघुन गेली आहे त्याचा शोध सुरु असून वर्णन खालील - सौ. पुनमदेवी नानु चौहान, वयः- ४० वर्षे, धंदाः- हाउसवाईफ रंगः-गोरा, उंची ५ फुट, बांधाः- मध्यम, चेहराः- उभट, डोळेः- काळे, नाकः-सरळ, केसः काळे लांब, कपडे :- निळया रंगाची साडी, गळयात सोन्याची मंगळसुत्र, नाकातः- सोन्याची चमकी, हातात हिरव्या रंगाच्या बांगडया व हिंदी बोलते. कोणास आढळल्यास पो.ह दिपककुमार पाटील उलवा पोलीस ठाणे नवी मुबंईशी संपर्क करावा असे आव्हान करण्यात आले

## उलवे हद्दीमध्ये आढळला अनोळखी मृतदेह

**दैनिक युवक आधार**
**उलवे वार्ताहर**

अनोळखी पुरूष वय अंदाजे 40 ते 45 वर्ष हा खाडीतील पाण्यामध्ये उताणे स्थितीत तरंगत असतांना मिळून आला त्यास उपचारार्थ उपजिल्हा रूग्णालय, पनवेल येथे घेवून गेले असता, तेथील वैदयकीय अधिकारी यांनी तपासून दाखलपूर्व 12:30 वा. मयत घोषित केले आहे. तरी सदर अनोळखी पुरूषाचा अज्ञात कारणास्तव पाण्यात बुडून मृत्यु झाला आहे वर्णन खालील प्रमाणे वय अंदाजे 40 ते 45 वर्ष, उंची 5.3 इंच, बांधा मध्यम, रंग- सावळा, केस काळे मध्यम, डोळे डावा डोळा बंद स्थितीत, तोंड बंद, नाक लहान, दाढी पांढरी लहान, नेसनीस काळया रंगाचा फुल बाहयाचा टी पर्ट त्यास पांढ-या रंगाच्या आडव्या लाईनींग व काळया रंगाची फुल पॅन्ट आणि पॅन्टच्या खिशात स्टिलची चावी व निळ्या रंगाचे छोटे कटर, कमरेस काळा धागा बांधलेला. तरी पोलीस ठाणे हद्दीत ताबे पोलीस कर्मचारी यांचे मार्फतीने यातील अप. मृत्यु, मधिल मयत इसमाचे नातेवाईकांचा शोध सुरु असून माहिती मिळाल्यास अनिल राजुरे-पोलीस उपनिरीक्षक नेम-उलवा पोलीस ठाणे मो.न 8600008869 किंवा सहा. पोलीस निरीक्षक अजित कणसे, मो. नं. 8669789100 संपर्क साधावा

# यवतमाळमध्ये 'शेतकरी सहवेदना दिन' पाळत श्रद्धांजली व उपोषण

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी -जितेंद्र खोडे

यवतमाळ,दि.19 मार्च – सामाजिक संघटना आणि सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालयाच्या वतीने दिनांक 19 मार्च रोजी 'शेतकरी सहवेदना दिन' साजरा करण्यात आला. साहेबराव करपे,त्यांची पत्नी मालतीबाई करपे आणि बुलढाणा जिल्ह्यातील पुरस्कारप्राप्त शेतकरी कैलास नागरे यांच्यासह देशभरातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांच्या स्मरणार्थ वैयक्तिक उपवास, सामूहिक उपोषण आणि श्रद्धांजली सभेचे आयोजन सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालयाच्या संदीप मंगलम टॉकीजजवळील प्रांगणात करण्यात आले. विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी दुपारी 12 ते



5 या वेळेत शोक व्यक्त करत, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजनांवर विचारमंथन केले. कार्यक्रमात सामूहिक चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. यात युवकांनी शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ घेतली. या चर्चासत्राला नंदकुमार बुटे, प्रा. घनश्याम दरने,नितीन पखाले, राजकुमार भितकर, मृणालिनी दहीकर, ॲड. सीमा तेलंग, प्रा. प्रिया वाकडे, प्रवीण देशमुख, आशिष महल्ले, प्रा. पंढरी पाठे, विनय मीरासे, वैशाली चव्हाण, प्रा. बाळकृष्ण सरकटे, अनिल गायकवाड, अशोक भुतडा, पल्लवी ठाकरे, प्रा. किशोर बुटले, धनंजय वानखेडे, स्नेहल रेचे, श्रीकांत निवल, विजय निवल, प्रा. सुवर्णा ठाकरे आदी मान्यवर उपस्थित होते. या आंदोलनस्थळी दिवसभरात सुमारे 200 नागरिकांनी भेट देऊन आपली सहवेदना व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकांक्षा वाघ तर समारोप प्रा. पंढरी पाठे यांनी केला.

## गरोदर माकडीणीच्या मृत्यूप्रकरणी वनविभागाच्या निष्काळजीपणाविरोधात निवेदन

### जबाबदार अधिकारी सिडाम,व कर्मचाऱ्यांवरती कारवाई करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**
**यवतमाळ**

वीर वामनराव चौक परिसरात विजेच्या रोहित्रावर अडकलेल्या दोन माकडांना वाचवण्यासाठी एम.एच.२९ हेल्पिंग हॅन्ड वन्यजीव संघटनेच्या कार्यकर्त्यांनी जीव धोक्यात घालून मदत केली. त्यातील एका माकडीणीची प्रकृती गंभीर असल्याने तिला पुढील उपचारांसाठी हलवण्याची गरज होती.मात्र,वनविभागाच्या हलगर्जीपणामुळे वेळेत मदत न मिळाल्याने तिचा मृत्यू झाला.

या घटनेच्या निषेधार्थ प्रा.पंढरी पाठे व एम.एच.२९ हेल्पिंग हॅन्ड वन्यजीव संघटना,यवतमाळ यांच्या वतीने माननीय वनसंरक्षक व उपवनसंरक्षक यांना आज दिनांक २० मार्च रोजी निवेदन देण्यात



आले.यात रेंज फॉरेस्ट ऑफिसर अमर सिडाम यांच्यासह जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी सहायक वनसंरक्षक निलेश सोनवणे यांनी घटनेची गंभीर दखल घेत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही केली जाईल,असे आश्वासन दिले. सदर घटनेमुळे यवतमाळ जिल्ह्यात वन्यजीव उपचार केंद्राच्या तातडीच्या आवश्यकतेचा मुद्दा पुन्हा अधोरेखित झाला आहे.वन्यजीव रेस्क्यू करणाऱ्या संस्थांना त्वरित मदत मिळावी यासाठी ठोस कार्यप्रणाली तयार करण्याची मागणी संघटनेकडून करण्यात आली आहे. यावेळी प्रा. पंढरी पाठे,प्रज्वल तुरकाने,शुभम तेलगोटे,जुबेर मलनस,गट्टू भगत,कल्याणी बोरकर,बॉबी बगमारे,महेश शेळके,आदित्य गणवीर,अभिजीत वाघमारे,प्रतीक तरळकर,रवी वाईकर,चिन्मय आडे,सनी मुरारी,इत्यादी उपस्थित होते.

# बोधगया मंदिर कायदा १९४९ रद्द करावा

## या मागणीसाठी खेड तालुक्यातील बौद्ध समाजाच्या वतीने मैत्रेय रॅली संपन्न

**प्रतिनिधी दैनिक युवक आधार**
**डॉ. देवेंद्र ओव्हाळ खेड पुणे.**

खेड तालुक्यातील समस्त बौद्ध समाजाच्या वतीने बौद्ध समाज मैत्रेय रॅलीचे आज मंगळवार दि. 18 मार्च 2025 रोजी आयोजन करण्यात आले होते. सदर रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक राजगुरुनगर ते तहसील कार्यालय तसेच प्रांत अधिकारी कार्यालय, खेड अशा पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. सदर रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणात खेड तालुक्यातील कानाकोपऱ्यातून बौद्ध समाज एकत्रित झाला होता. तथागत गौतम बुद्धांचा विजय असो, विश्वरत्न डॉ,बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो,महाबोधी बुद्ध विहार 1949 चा कायदा रद्द झालाच पाहिजे. अशा घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. बोधगया येथील महाबोधी महाविहार, जिथे भगवान बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली, हे स्थळ बौद्ध समुदायासाठी अतिशय महत्त्वाचं तीर्थक्षेत्र आहे. दुर्दैवानं, १९४९ च्या बोधगया मंदिर कायदा अंतर्गत, या ऐतिहासिक स्थळाचं व्यवस्थापन पूर्णपणे बौद्ध समुदायाच्या हातात नाही. या कायद्यानुसार, मंदिर व्यवस्थापन समितीमध्ये नऊ सदस्य असतात. त्यापैकी पाच अन्य समाजाचे आणि केवळ चार बौद्ध असतात. ही न्यायिक बाब नाही.. हे बौद्ध समुदायाच्या हक्कांवर थेट हल्ला आहे. यासाठी अनेक वर्ष त्या ठिकाणी लढा चालू आहे. महाबोधी महाविहाराचं व्यवस्थापन पूर्णपणे बौद्ध समुदायाकडे सोपवावं आणि बोधगया मंदिर कायदा १९४९ रद्द करावा. या मागणीसाठी बोधगया येथे बौद्ध भिक्षू १२ फेब्रुवारीपासून शांतीपूर्ण वातावरणात निदर्शनं करत आहेत. परंतु बिहार सरकारच्या पोलिसांनी निदर्शकांना जबरदस्तीनं काढून त्यांच्या लोकशाही अधिकारांवर गधा आणली. हा केवळ व्यवस्थापनाचा प्रश्न नाही तर, बौद्ध समाजाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक ओळखीशी संबंधित प्रश्न आहे. बौद्धांना महाबोधी महाविहाराचं पूर्ण अधिकार मिळाले पाहिजेत; जेणेकरून त्यांना त्यांच्या धार्मिक परंपरा आणि विधींचं पालन मुक्त व स्वतंत्रपणे करता येईल. यासाठी समस्त खेड तालुक्यातील बौद्ध समाजाच्या वतीने मैत्रेय रॅलीचे आयोजन केले होते. यावेळी मोठ्या प्रमाणात बौद्ध समाजातील धम्म बांधव, भगिनी तसेच समता सैनिक दल उपस्थित होते.



# क्रोधावर नियंत्रण, हे तर संस्कारी लक्षण

**दैनिक युवक आधार-**
आज आपल्या देशातील युवाशक्ती वैश्विक बलाढ्य शक्ती म्हणून ओळखल्या जाते. मित्रहो कोणताही देश कार्यक्षम मानवी शक्तीमुळे मोठा होतो. केवळ भौतिक संपत्ती देशाला संपन्न बनवू शकत नाही.त्यामुळे आमच्या देशातील या शक्तीचा आम्हाला सार्थ अभिमान असला पाहिजे, पण त्याची दुसरी बाजू लक्षात घेणेही गरजेचे आहे. युवाशक्ती फक्त संख्यात्मक दृष्ट्या मोठी असेल तर तिची उपयुक्तता किती? ती गुणात्मक दृष्ट्या उपयुक्त असली पाहिजे. त्यासाठी युवापिढीचा सर्वांगिण विकास होण्यासाठी क्रोधावर नियंत्रण असणारी युवाशक्ती आम्हाला हवी आहे. त्यामुळे तात्काळ संस्कारी,संयमी आणि बुद्धिमान युवापिढी होऊन आमच्यासमोर लगेच उभी राहिलं असा तात्काळ चमत्कार होईलं असे थोडेच आहे.

क्रोधाग्नी या शब्दातच अग्नी शब्द समाविष्ट झाला आहे. माणूस जर विवेक विसरला तर त्याच्या स्वभावात क्रोध प्रवेश करणार. क्रोधाने प्रवेश केल्यावर किती नात्यांची राखरांगोळी होणार हे सांगणे कठीण आहे. युवा अवस्थेत जोश प्रचंड असतो,पण होश असेल तरच त्या शक्तीचा योग्य उपयोग होईल.अन्यथा उपद्रवी युवाशक्ती फक्त असंख्य प्रश्न निर्माण करतांना दिसतात. केवळ आपले उपद्रवमूल्य सिद्ध करण्यासाठी सामाजिक व राष्ट्रीय संपत्तीचा विनाश करणारी युवाशक्ती देशप्रेमी असू शकत नाही. अध्यात्म व संतसाहित्याचा थोडाही स्पर्श ज्या युवा मनाला झाला असेल किंवा सामाजिक जाणिवेतून निर्माण झालेले समाजभान त्याला कळाले असेल तर तो सर्व प्रथम आपल्या देशाला महत्व देईल. देशप्रेमाचा स्पर्श ज्या युवामनाला कधी होत नाही. ते युवामन केवळ जाती व धर्मासाठी दिशाहिन संघर्ष करुन आपले भविष्यच दिशाहिन करते. त्या युवकांची शक्ती,बुद्धी व कार्यक्षमता देशासाठी उपयुक्त असण्याची सुतराम शक्यता नसते. विवेकी युवक जीवनात कितीही ताणतणाव,त्रास,दुःख असूनही त्याचा त्रागा कधीच करुन घेत नाहीत.

कितीही राग आलेला असेल तरी तो संयमाने पचविणे आणि संयमानेच व्यक्त करतो. हे ज्याला शक्य झाले तो जग जींकण्याची उमेद कायम ठेवतो. क्रोधीत होणारी माणसे आपल्या क्रोधाचे समर्थन करतात. विचारी माणसे ' माणूस जोडो अभियान ' राबवितात. पण क्रोधवीरांचा एकमेव उपक्रम अव्याहतपणे सुरु असतो.तो म्हणजे ' माणूस तोडो अभियान '. एकदा तोडलेला माणूस जोडणे महाकठीण. त्यासाठी खूप मोठी अग्निपरिक्षा देवूनही समोरचा माणूस फार तर त्या व्यक्तीच्या वर्तनावर सावध प्रतिक्रिया देतो. सर्व काही मनात ठेऊन," तुमच्याविषयी माझ्या मनात आता काहीच नाही " असे चेहऱ्यावर कृत्रिम हास्य आणून म्हणतो. या क्रोधवीराचा वरचा मजला रिकामा असल्यामुळे तो लगेच समजतो समोरच्या माणसाने मला माफ केले आहे किंवा तो मला घाबरलेला आहे. पण ह्या दोन्ही गोष्टी पूर्ण असत्य असतात. तो सावध झालेला असतो आणि कायमचा दुरावलेला असतो. त्याच्या मनात या शिघ्रकोप्याची नोंद,मानवी भावभावना नसलेला पशू म्हणून झालेली असते. याची दुसरी बाजूसुद्धा आपण समजून घेतली पाहिजे. ज्या व्यक्तीवर अन्याय झाला आहे.त्याचा सात्विक संतापही आपण समजून घेतला पाहिजे. झालेल्या अन्यायामुळे तो क्रोधित झाला आहे. इथे त्याच्या आंतरिक भावना, त्याच्या आतिल उल्घाल, त्याच्या मनाचा कोंडमारा या सर्व बाबींना तो त्याच्या सात्विक संतापाच्या माध्यमातून वाट मोकळी करुन देतो.त्यावेळी त्याला समजून घेऊन त्याला न्यायाची हमी देणे हे मानवी मन असलेल्या सूज्ञांचे कर्तव्य ठरते.

पण ज्याचा मूळ स्वभाव कोपिस्ट आहे,काही अनुवंशिक दुर्गुण ही त्याच्या पूर्वजांची देण आहे,काही मित्र परीवारवाराकडून प्राप्त झालेली देवाणघेवाण आहे आणि ते सर्व अभिमानाने आणि आनंदाने जोपासने,कुरवाळणे, त्याला गोंजारणे त्याच्या पातळीवर सुरु असेलं तर त्याचे सर्वत्र कौतुक झाले पाहिजे,असा अट्टाहास करणे आणि तो सर्वांनी सर्वत्र मान्य करणे कसे काय शक्य आहे? त्यामुळे आपल्या व्यक्तीगत, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनावर त्याचे परिणाम होण्यापूर्वी क्रोधाला नियंत्रणात आणने खूप गरजेचे आहे. मोह,लोभ,स्वार्थ,असूया, यांना बळी पडून आपण सद्गुणाकडे पाठ फिरवतो. आपल्यातील उणिवा व दुर्गुण हा आपल्या रागाचा विषय व्हावा. त्यासाठी स्वतःवर रागावा.त्याचा उपयोग आपल्यात सकारात्मक बदल करण्यासाठी होईल. त्यामुळे आपण स्वतःला उत्तम संस्कार देण्यासाठी सक्षम होऊत. आपल्या कर्तव्य पूर्तीसाठी पालक,शिक्षक आपल्या मुलावर आणि विद्यार्थ्यावर रागावतात. ज्या ठिकाणी अन्याय अत्याचार करणारे नराधम आहेत. त्या ठिकाणी युवापिढी क्रोधित होऊन उठली तर अन्याय कर्त्याच्या मनात धाक निर्माण होईल. त्यांची हिम्मत कमी होईल. अन्यायग्रस्तांना आनंद व आधार मिळेल. शिवछत्रपतींना आधार देणारे मावळे मोघलांच्या विरोधात पेटून उठले.ब्रिटीश साम्राज्यशाही विरोधात क्रांतिकारकांनी रोमहर्षक लढा दिला.तो त्यांचा क्रोध किती अर्थपूर्ण होता.तो त्यांचा क्रोध आंधळा नव्हता. ब्रिटीश साम्राज्याला हादरा देण्यासाठी त्या क्रोधातून एक सूत्रबद्ध लढा तयार झाला होता. तो लढा भारतीयांच्या मनातील पिढ्यान्पिढ्यांचा गुलामीचा इतिहास मिटवून स्वातंत्र्य प्राप्तीचा ज्वालाग्नी प्रज्वलित करत होता. त्या क्रोधाने स्वकिंयाच्या मनात स्वाभिमानाची ज्योत धगधगत होती. त्यामुळे त्यांची मने तेजाळून निघत होती. असा क्रोध आपले इप्सित साध्य होईपर्यंत कायम ठेवायचा असतो. तो आपल्या अस्मितेचे व अस्तित्वाचे प्रतिक असतो.दैनंदिन व व्यक्तीगत व कौटुंबिक जीवन जगतांना मात्र आपले क्रोधावर नियंत्रण नसेल.आपण आपल्या रागाचे कौतुक करत असा दरारा निर्माण केल्याशिवाय आपल्या घरात आणि समाजात आपल्या अस्तित्वाची दखल कोणी घेत नाही. त्याशिवाय समोरची माणसे आपल्याला वचकुन वागणार नाहीत. हा आपला समज असेल तर आपण मूर्खाच्या नंदननात वावरत आहोत.एवढे जरी कळाले,तरी पुष्कळ झाले. त्यानंतर त्या व्यक्तीला तात्काळ ' महामूर्ख ' ही एक महान उपाधी देऊन त्याचा गौरव करायला काहीच हरकत नाही. असे लोक आपले थडगे आपणच तयार करत असतात. तर मित्रहो,असे हे महामूर्ख शिरोमणी ' एक ढूंढो, तो हजार मिलते है.' हेच वास्तव आहे.अशा महामानवांना समजून सांगण्याची प्रत्येकाची हातोटी वेगवेगळी असते. त्यासाठी मन,भावना,मस्तिष्क याचा उपयोग केलाच पाहिजेत,असे काहीच नाही. हाताने किंवा हातात पडेल त्या साधनाने त्या ' मूर्खराज ' ला समजावले जाऊ शकते.यावरुन एक गोष्ट लक्षात येते. ही वर्तणूक संपर्कातील लोकांना तोडणारी असते हे मात्र नक्की. मग परकी माणसे हे महाभाग जोडणार कसे? तर मुळीच नाही.या कर्तव्यदक्ष महामानवाच्या अपकिर्तीमुळे दुरची माणसे दुरच राहणार आणि जवळची दूर जाणार.हे निर्विवाद सत्य आहे.या क्रोधाचा उपयोग केवळ त्याच्या दैनंदिन जीवनातील आनंद हरवून टाकण्यासाठी होणार. त्याच्या अशा आततायी वर्तनाने या महाशयाच्या मानसिक व शारीरिक आरोग्याची वाट लागणार. शरीर अनेक आजारांचे माहेरघर होणार. त्याचे दुष्परिणाम चेहरा लालबुंद होणार,अनावश्यक चढ्या आवाजात बोलणे. त्यानंतर अशा शिघ्रकोपी संतापीलालास श्वासोच्छास घेणे कठीण होणार .या सर्व बदलामुळे कोणतेही कार्य त्या व्यक्तिकडून होण्याची शक्यता नसते. अशी व्यक्ती देशाची मानवी संपत्ती कशी होईल? नकारात्मक विचारसरणीचे युवक देशाची मानवी संपत्ती होवू शकत नाही. ही शक्ती सगळीकडे फक्त समस्या वाढविण्याचे काम करते. क्रोध हे दुधारी शस्त्र आहे. त्याचा उपयोग कसा करायचा हे त्या व्यक्तीवर अवलंबून असते.नकारात्मक वृत्तीच्या लोकांना क्रोध विनाशाकडे नेतो.सकारात्मक वृत्तीचे लोक आपला क्रोध संयमाने व्यक्त करतात. तर दुसऱ्या प्रकारचा क्रोध देशाभिमान रुजवतो,सत्कार्य करायला शिकवतो. सद्गुणाकडे वाटचाल करायला लावतो. आपली वृत्ती शांत,संयमी,समाधानी व आनंदी ठेवल्यास आपण तणावमुक्त जीवन जगू शकतो. क्रोधीत व्यक्तीकडे शांत,संयमी वृत्तीने पाहिल्यास आपण तणावमुक्त जीवन जगू शकतो. तो शिघ्रकोपी संतापीलाल झाला म्हणून आपण त्याचे अनुकरण करण्याची गरज नसते .आपली संयमी वृत्ती आपल्याला अर्धी लढाई जिंकुन देते.क्रोधाशी सामना करण्यासाठी क्षमाशीलता हा मार्ग अनेकदा उपयोगी पडतो. ज्या वेळेस तो मार्ग पूर्णता बंद होतो,त्यानंतरच पुढील मार्गाचा अवलंब करावा.तोपर्यंत संयम पाळण्या साठी आपल्यात शांतता असावी.साधना,ध्यान, चिंतन आणि मनन करणाऱ्या व्यक्ती क्वचित प्रसंगी क्रोधीत होतात. त्या क्रोधालाही खूप अर्थ असतो.ज्याप्रमाणे प्रकाश आणि अंधार एकत्र राहु शकत नाहीत त्याप्रमाणे क्रोध आणि आत्मज्ञान एकत्र राहु शकत नाही. आपण स्वतःचे शत्रू आहोत,त्याप्रमाणे स्वतःचे मित्रही आहोत.असे गिताज्ञान सांगते. मी इतरांना किती इजा पोहचवितो हे मी सांगू शकत नाही,पण क्रोधीत झाल्यामुळे मात्र मी स्वतःच घायाळ होतो.खजील आणि पराभूत होतो. असुरक्षित मनोराज्य माझ्यावर साम्राज्य करायला लागते.मी माझ्या मनोवृत्तीचा गुलाम होतो. त्यामुळे क्रोधीत न होण्याचे आपल्या ईच्छाशक्तीला आवाहन करु या.त्याचा मानवी जीवनातील लाभ असा अत्यंत आनंदाने व प्रसन्न चित्ताने आपली दिनचर्या जगणे शक्य होईलं. उथळ आणि उताविळपणा क्रोधाची जननी आहे तर तिरस्कार त्याचा जन्मदाता.प्रत्येक काम करतांना डोके शांत ठेवले म्हणजे मेंदू कार्यक्षम राहिलं.आपल्या कामावर प्रेम करणे शक्य होईल.आपण जेंव्हा आपल्या दैनंदिन कामावर प्रेम करतो तेंव्हा ते काम आपल्याला ओझे वाटत नाही. त्या कामाच्या मोबदल्यावर माझे कुटुंब अवलंबून आहे,तर त्या कामावर मी किती प्रेम करावे? माझी समग्र एकाग्रता त्या ठिकाणी असावी.त्यावेळी अन्य विचारांना माझ्या डोक्यात स्थान देवून कसे चालेल? हा मनोनिग्रह महत्वाचा. मनोनिग्रह हा कधीच डळमळीत होणारा नसतो आणि जो डळमळीत होतो.तो मनोनिग्रह कसला ?

क्रोधावर नियंत्रण ठेवण्यासाठी मौन हा रामबाण उपाय आहे. कित्येक अप्रिय प्रसंग केवळ मौनामुळे टळू शकतात.विस्ताराने स्पष्टीकरण किंवा प्रतिस्पर्ध्याची बोलती बंद करण्यासाठी ह्या दोन्ही बाबी वाद वाढवणाऱ्याच आहेत. पण मौन पाळणे हा त्यावरचा खूप प्रभावी मार्ग आहे. आपल्या प्राचिन ग्रंथात एक मौलिक सुभाषित आहे,' मौनम सर्वात साधनम ' किंवा ' या विषयावर आपण उद्या बोलुत ' शिघ्रकोपी माणसे काही कालावधीने शांत होतात. त्यांना त्यांची चूक काही वेळाने लक्षात येते. त्यावेळी त्याच्याशी सहज संवाद साधणे शक्य होते. एवढा संयम जर युवा अवस्थेत प्राप्त झाला तर पुढील वाटचाल खूप सोपी होते.तणावपूर्ण वातावरणात काही वेळेस एखादा नर्म विनोद करुन वातावरण प्रसन्न करणे शक्य होते. समयसूचक माणसे हे काम अत्यंत कौशल्याने करतात.परस्पर सामंजस्य आणि सुसंवादाचा अभाव असल्या मुळे भावनात्मक दरी निर्माण होते.त्यातून वाढत जाणारे गैरसमज हे परस्पर द्वेषाचे खूप मोठे कारण आहे. आपलीच बाजू बरोबर कशी हे सिद्ध करण्याची जी चढाओढ चालते. तो प्रकारच अत्यंत उतावळेपणाचा आहे. अविचारी व्यक्तीच्या परीस्थितीचा पूर्ण विचार करुन त्या व्यक्तीला समजुन घेणे हे महत्वाचेआहे.त्याबरोबरच जो अन्यायग्रस्त आहे. त्याचा अधिक विचार करणे गरजेचे आहे.

क्रोध, राग , असूया ,द्वेष,मत्सर यावर विजय मिळवून परस्पर सामंजस्य निर्माण करणे हे उगवत्या पिढीच्या संस्काराचा व अत्यावश्यक शिक्षणाचा भाग असावा. हे सामंजस्य जर कौटुंबिक पातळीवर असेल तर ते सामाजिक, राष्ट्रीय आणि वैश्विक पातळीवर झिरपत जाते. जागतिक पातळीवर शांतता हवी असेल तर प्रत्येक व्यक्तीला शांततेचे लाभ व क्रोधाचे दुष्परिणाम कळाले पाहिजे. माफ करा. अपेक्षा खूप मोठी करतोय,पण आज व्यक्ती वर्तनातील ज्वालामुखीचा उद्रेक जगाला विनाशाकडे नेत आहे.त्याला आवर घालणारी मानवी मने जगाला मानवतेची दिशा दाखवतील.

**प्रा. वसंत गिरी**



## उर्दू शाळेला मुख्याध्यापक देता का मुख्याध्यापक ?

**दैनिक युवक आधार**
**नेवासा :** प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असतानाही, केंद्र शासनाच्या पीएम श्री योजनेत समावेश झालेल्या तालुक्यातील जिल्हा परिषदेची सर्वाधिक पटसंख्या असलेली उर्दू शाळा तब्बल १८ महिने मुख्याध्यापकांविना कार्यरत आहे.

नेवासा येथील उर्दू शाळा ही जिल्ह्यातील सर्वाधिक विद्यार्थीसंख्या असलेल्या दुसऱ्या क्रमांकाची शाळा आहे. या शाळेची गुणवत्ता व सुविधा पाहता केंद्र शासनाच्या पीए श्री योजनेत समावेश झाला आहे. या अंतर्गत कोटी रुपयांचा निधी अपेक्षित असून, त्याच्या योग्य वापराची जबाबदारी मुख्याध्यापकांवर असते. मात्र, १८ महिने उलटूनही शाळेस मुख्याध्यापक मिळालेला नाही.

> **पीएम श्री योजनेअंतर्गत आमच्या शाळेची निवड झाल्यानंतर गेले पंधरा-सोळा महिने मुख्याध्यापक नाही तसेच दोन शिक्षकही नाहीत प्रशासनेने अशा महत्त्वाच्या शाळेकडे लक्ष देणे गरजेचे आहे व आम्हाला त्वरित शिक्षक आणि मुख्याध्यापक मिळावेत**
>
> **– हारुण जहागीरदार, शाळा व्यवस्थापन समिती**

उर्दू शाळेतील केवळ मुख्याध्यापकच नव्हे, तर तीन शिक्षकांची पदेही गेल्या वर्षभरापासून रिक्त आहेत. यामध्ये एका पदवीधर शिक्षक व दोन उपाध्यापक पदांचा समावेश आहे. एवढेच नव्हे, तर या शाळेवर देखरेख करणाऱ्या विस्तार अधिकारी पदावरही गेल्या सहा महिन्यांपासून नियुक्ती झालेली नाही.

मराठी माध्यमासाठी स्वतंत्र पदोन्नती प्रक्रिया पार पडली. मात्र उर्दू माध्यमाकडे दुर्लक्ष करण्यात आले. जिल्हा परिषद प्रशासनाच्या या वेळकाढूपणामुळे स्थानिक नागरिक व पालकांमध्ये संतापाची भावना असून, उर्दू माध्यमाच्या शाळांकडे होणाऱ्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.राज्यात मुख्यमंत्री १०० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत शिक्षण व्यवस्थेतील रिक्त पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत तरी नेवासा उर्दू शाळेस मुख्याध्यापक मिळेल का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# छत्रपतीचा अवमान करणाऱ्या भाजप नेत्याची खासदारकी रद्द करा : संभाजी माळवदे

## काँग्रेससह विविध संघठणाकडून भाजपा सरकारचा निषेध

**दैनिक युवक आधार**
**(नेवासा प्रतिनिधी)-** लोकसभेमध्ये भाजप नेत्याकडून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान केल्याप्रकरणी आज काँग्रेससह बहुजन मुक्ती पक्ष, बसपा, व इतर संघटनाकडून निषेध करण्यात आला. सविस्तर वृत्त असे की, देशात सत्ताधारी भाजपा पार्टीतील मोठ्या फळीतल्या नेत्याकडून रोज काही ना काही चिथावनीखोर वक्तव्य करून वादंग निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यात महान पुरुषांना देखील ओढवून घेण्याचे काम सोयीस्कररित्या हे नेते करताना दिसतात. सध्या दिल्लीत लोकसभेचे अधिवेशन चालू आहे या अधिवेशनात भाजपचे प्रदीप पुरोहित या खासदाराने पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मागच्या जन्मी छत्रपती शिवाजींचा अवतार होते. मोदी हे शिवाजी महाराजच आहे असे वक्तव्य केले. पुरोहित यांनी केलेल्या वक्तव्याचे पडसाद महाराष्ट्रभर पसरले असून ठीक ठिकाणी याचा निषेधही करण्यात आला. आज नेवासा तहसील कार्यालय येथे काँग्रेससह, बहुजन मुक्ती पक्ष, बसपा, व इतर संघटना कडून छत्रपतीचा अवमान केल्यामुळे प्रदीप पुरोहित व भाजपा सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी पुरोहित व भाजपा सरकार विरोधात निषेधाच्या जोरदार घोषणा देण्यात आल्या. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड हिंदुस्थानचे आराध्या दैवत असून त्यांचा अवमान आम्ही सहन करणार नाही ज्या खासदाराने असे वक्तव्य केले त्याची खासदारकी रद्द केलीच पाहिजे अशी मागणी केली.शहराध्यक्ष अंजुम पटेल यांनी देशातील अनेक प्रश्न वाढती गुन्हेगारी, महिलांवरचे अत्याचार, महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, बुडती अर्थव्यवस्था या प्रश्नापासून पळ काढण्यासाठी जाणून बुजून छत्रपतीं सारख्या महान पुरुषावर अवमान कारक वक्तव्य करून लोकांचे लक्ष भरकटविन्याचे काम भाजपा नेते करत आहे.तर गणपत मोरे यांनी छत्रपती हे अठरापगड जातींचे राजे होते. आपल्या वरिष्ठ नेत्याला खुश करण्यासाठी भाजपा नेते छत्रपतीविषयी रोज काही ना काही अवमानकारक वक्तव्य करत असतात. हा महाराजाचा अवमान नसून पूर्ण महाराष्ट्राचा अवमान आहे. जाती जातीमध्ये, धर्मधर्मामध्ये तिरस्काराचे विष कालवण्याचे काम भाजप नेते करत आहे असे स्पष्ट केले. यावेळी नेवासा तहसीलदार संजय बिरादार यांना निषेधाचे निवेदन देण्यात आले. निवेदनावेळी काँग्रेस अध्यक्ष आण्णासाहेब पटारे,सतीश तऱ्हाळ, गुलाब पठाण,बहुजन मुक्तीचे राम मगरे, मिन्हाज शेख, बसपाचे अध्यक्ष विकास चव्हाण, युवा नेते हरीश चक्रनारायण,सामाजिक कार्यकर्ते संजूभाऊ नारळे आदीसह आंदोलक उपस्थित होते.



## विवाहिता बेपत्ता




दैनिक युवक आधार
पनवेल, प्रतिनिधी
घरकामासाठी जाते असे सांगून घराबाहेर पडलेली एक विवाहिता महिला अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार उलवे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

सौ.बिऊरा दिपक बिश्वकर्मा (36 रा.सेक्टर 8, उलवे) रंग गोरा, उंची 5 फुट, चेहरा गोल, डोळे काळे, नाक सरळ, केस काळे वाढलेले असून, अंगात लाल रंगाचा कुडता व पायामध्ये शुज आहेत. तिला हिंदी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवे पोलीस ठाणे किंवा पो.हवा.किशोर कर्डीले मो.नं.9004747512 येथे संपर्क साधावा.

## जागृती प्रतिष्ठानच्यावतीने शिवजयंती उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**श्रीरामपूर :** नॉर्दन ब्रँच येथील युवा जागृती प्रतिष्ठानच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस अशोक कारखान्याचे संचालक निरज मुरकुटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले व महाराजांची आरती करण्यात आली. उपस्थितांना लाडूचे वाटप करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार सदैव प्रेरणादायी असल्याचे मुरकुटे यांनी सांगितले. योगेश जाधव, प्रतिष्ठानचे संस्थापक रोहित मालकर यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सिद्धार्थ मुरकुटे, लोकसेवा विकास आघाडीचे शहराध्यक्ष नाना पाटील, गणेशसिंग राजपूत, रोहन डावखर, बाबासाहेब मोरगे, गणेश मगर, योगेश जाधव, लहानु त्रिभुवन, उत्तमराव मालकर, रमन मालकर, नामदेव जाधव, रावसाहेब तोडमल, गणेश भिसे, निलेश लोळगे, भीमशक्ती सामाजिक संघटनेचे अंबादास निकाळजे, डॉ. मच्छिन्द्र त्रिभुवन, संतोष देसाई, अतुल भिसे, राहुल जाधव, संजय मोरे, गौरव तुपसाखरे, प्रशांत कारवाळ, चेतन कारवाळ, हर्षद देव, किशोर चव्हाण, दत्तात्रय मोरगे, मनोज भिसे, योगेश काळे, मनोजभैय्या भिसे, दीपक खैरनार, विशाल कदम, अमोल परदेशी, बापु खैरनार, राजेंद्र लाड, गणेश दिवेकर, अमोल वराडे, गणेश दळवी, दत्तात्रय खेमनर, रोहित कोकरे, निलेश राणेजा, खुशाल ढोरमारे, योगेश यादव, बाळासाहेब मुद्राक्षे, नयन ठोंबरे, नरेश मुसळे, गणेश जाधव, राहुल पांढरे, तुषार भोर, नारायण जगताप व परिसरातील नागरिक उपस्थित होते.



# छत्रपती शिवाजी महाराज शौर्य आणि धैर्याचे प्रतीक : ससाणे

**दैनकि युवक आधार**
**श्रीरामपूर :** छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. अत्यंत धैर्य राखून आपले सैन्य उभे केले आणि मुघल राजवटी विरोधात लढले म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराज शौर्य आणि धैर्याचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे यांनी केले. काँग्रेस कमिटी आणि माजी आमदार स्व.जयंतराव ससाने मित्र मंडळाच्या वतीने गिरमे चौकात आयोजित केलेसल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती कार्यक्रमात ते ससाने बोलत होते. ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र हे आपल्यासाठी एक अनमोल आणि दिशादर्शक आहे. हाराजांच्या जीवन चरित्रावरून न्याय आणि समानता, महिलांचा आदर, राष्ट्रप्रेम आणि कर्तव्यनिष्ठता दिसून येते. यावेळी जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन गुजर, माजी नगराध्यक्ष संजय फंड,जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाबासाहेब दिघे, माजी सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, शिवसेना उबाठाचे जिल्हा उपप्रमुख सचिन बडदे, माजी नगरसेवक रमेश कोठारी, दिलीप नागरे, रितेश रोटे, पंडीत बोंबले, के. सी. शेळके, आशिष धनवटे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, कैलास कणसे, सोमनाथ गांगड, विलास लबडे, दत्तनगरचे सरपंच प्रेमचंद कुंकलोळ, मर्चंट असोसिएशनचे निलेश नागले, मुन्ना झंवर, गौतम उपाध्ये, सुनील शिरसाट, रियाज पठाण, प्रताप कवडे, रज्जाक पठाण, मुरली राऊत, संजय गोसावी, सुरेश ठुबे, लहानु त्रिभुवन, अशोक जगधने, सुरेश ठुबे, सुनील साबळे, रितेश एडके, संतोष परदेशी, युवक काँग्रेसचे अध्यक्ष रितेश चव्हाणके, सनी मंडलिक, वैभव कुऱ्हे, प्रताप कवडे, शंकर नन्नोर, संजय वडीतके, अमोल शेटे उपस्थित होते.



# मलाबार गोल्ड अँड डायमंड्सकडून अहिल्यानगरमधील ५४ विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती

## शिक्षणाद्वारे महिला सक्षमीकरणाच्या समूहाच्या दृष्टिकोनाला बळकटी

**दैनकि युवक आधार**
**अहिल्यानगर :** भारतातील आघाडीचा व्यवसाय समूह आणि मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची पालक कंपनी असलेल्या मलाबार समूहाने महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमधील ५४ पात्र विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती देऊन तरुणींना शिक्षणाद्रे सक्षम करण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पूर्तता केली. या विद्यार्थिनींना आर्थिक अडचणींशिवाय त्यांच्या शैक्षणिक आकांक्षा पूर्ण करण्याचा अधिकार मिळावा यासाठी शष्यवृत्तीच्या रूपाने त्यांच्या शिक्षणाला पाठिंबा म्हणून एकूण ५,१६,००० रुपये याप्रसंगी वितरित करण्यात आले.शिष्यवृत्ती वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगरचे अध्यक्ष श्री. रामचंद्र हरिभाऊ दरे, उपाध्यक्ष श्री. विवेक प्रभाकर भापकर, उपाध्यक्ष, सचिव श्री. विश्वासराव दत्तात्रय आठरे, सहसचिव श्री. जयंत रामनाथ वाघ, तसेच खजिनदार तथा अधिवक्ता दीपलक्ष्मी संभाजीराव म्हसे पाटील, कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉक्टर बाळासाहेब सागडे, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य, डॉक्टर संजय कळमकर, कार्यालयीन अधीक्षक, श्री जगन्नाथ सावळे, सूत्रसंचालन, डॉक्टर सुनिता मोटे आणि देवेंद्र महाबळ, स्टोअर मॅनेजर, मलाबार गोल्ड अँड डायमंड्स या मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमातील त्यांच्या उपस्थितीने महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सामूहिक प्रयत्नांसह, स्त्रियांना समाजात सन्माननीय स्थान मिळविण्यात मदत करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.अहिल्यानगरमधील या शिष्यवृत्ती वितरण कार्यक्रमातून संपूर्ण भारतात शिक्षण आणि कौशल्य विकासाला पाठिंबा देण्याच्या समूहाच्या व्यापक प्रयासांना ठळकपणे अधोरेखित करण्यात आले आहे. शाश्वत उपक्रमांना पाठिंबा देण्याच्या मलाबार समूहाच्या व्यापक ध्येयामुळे भविष्यातील पिढ्यांना सक्षम बनविण्यासाठी आणि सर्वांसाठी समावेशक, शिक्षित समाज निर्माण करण्यासाठी समूह वचनबद्ध राहिला आहे. या उपक्रमाबाबत बोलताना, मलाबार समूहाचे अध्यक्ष एम.पी. अहमद म्हणाले, ङ्गङ्गशिक्षणाद्रे प्रगतीचा पाया रचला जातो आणि तरुणींना ज्ञानाने सुसज्ज करणे हा सकारात्मक बदल घडवून आणण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. कारण शिक्षण हे राष्ट्राच्या प्रगतीचा पाया रचते आणि तरुणींना त्यांच्या जीवनाचा मार्ग स्वतःच आखण्यासाठी साधन आणि ज्ञानाने सुसज्ज करणे हे त्यांचे उज्ज्वल भविष्य सुनिश्चित करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. या शिष्यवृत्ती केवळ मुलींसाठी आर्थिक मदत म्हणून केवळ मानल्या जाऊ नयेत; तर त्या आपल्या समाजाच्या भविष्यातील गुंतवणूक देखील आहेत. ज्यामुळे या तरुणींच्या प्रतिभेची पूर्णत्वाने भरारी आणि त्यांच्या यशाच्या पूर्ततेत भर घातली जाण्यासह, कोणत्याही आर्थिक अडचणींची त्यात बाधा येणार नाही याची खात्री केली गेली आहे.